मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

मराठीतील आद्य महाकाव्य	–	डॉ. द. भि. कुळकर्णी
आज अचानक गाठ पडे	–	कवि : वामन इंगळे
कृष्णचंद्र	–	मुकुंद जागीरदार
वाणी येथील प्राध्यापक परिषद	–	प्रा. गोविंद देशपांडे
'बी' कवींचे काव्यविषयक विचार	–	डॉ. मा. गो. देशमुख

डिसेंबर १९६८

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जळगाव (जामोद) येथे श्रीपाद कृष्णांचे स्मारक

जळगाव (जामोद), जि. बुलडाणा येथील कला–वाणिज्य महाविद्यालयाच्या संचालक संस्थेने त्या महाविद्यालयाला कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे नांव देण्यासंबंधी विचार चालविला असून त्या संस्थेने या विषयी केलेला ठराव विदर्भ साहित्य संघाकडे पाठविला आहे तो संपूर्ण ठराव पुढे दिला आहे.

जळगांव शिक्षण मंडळाची दि. १२–११–६८ ला विशेष बैठक आयोजित करण्यांत आली. या बैठकीत पुढील विषय ठेवण्यांत आला.

विषय:– कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी निमित जळगांव येथील महाविद्यालयाचा इमारत निधी गोळा करण्यांस मदत करण्यासंबंधी विदर्भ साहित्य संघ नागपूर यांना विनंती करण्या-संबंधी ठराव घेण्यांत आला. तो खालील प्रमाणे–

आम्ही जळगांव–जामोद येथे १९६५ साली जळगांव शिक्षण मंडळाच्या वतीने कला–वाणिज्य महविद्यालय स्थापन केले. या गांवी कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी १४ वर्षे वास्तव्य केलेले असून त्यांची बरीचशी साहित्य निर्मिति याच ठिकाणी झाली आहे. या महाविद्यालयाला त्यांचे नांव देणे अधिक उचित होईल अशी महाविद्यालयाच्या संचालक मंडळाची इच्छा आहे.

महाविद्यालयाला स्वतंत्र इमारतीची आवश्यकता असून त्यासाठी अंदाजे ३ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यापैकी निम्मे रक्कम अनुदान रुपाने सरकारकडुन मिळू शकेल. आणि दीड लाख रुपये देणगी रुपाने जमा करावे लागतील. आमची अशी इच्छा आहे की विदर्भ साहित्य संघ आणि महाराष्ट्रातील साहित्य संघ, नाटच संस्था व अन्य संस्थांनी तसेच साहित्यकांनी आर्थिक मदत केल्यास आवश्यक निधी गोळा होऊ शकेल. तसेच त्यांच्या स्मरणार्थ नाटचगृह आणि ग्रंथालय या साठी इमारतीची योजना असून त्यासाठी सरकारकडूनही अनुदानाची अपेक्षा आहे.

म्हणून जळगांव शिक्षण मंडळ, विदर्भ साहित्य संघाला: नागपूर: कै. कोल्हटकरांचे चिरकालीन स्मारक बांधण्यास आर्थिक मदत करण्या विषयी विनंती करीत आहे.

ठराव सर्वानुमते पास झाला.

सत्य प्रतिलिपी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) डिसेंबर १९६८ (अंक ८

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेषे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
धंतोली, नागपूर–१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ	
२१८	संपादकीय
२२१	मराठीतील आद्य महाकाव्य डॉ. द. भि. कुळकर्णी
२३०	आज अचानक गाठ पडे वामन इंगळे
२३३	कृष्णचंद्र मुकुंद जागीरदार
२३६	वणी येथील प्राध्यापक परिषद प्रा. गोविंद देशपांडे
२३९	ग्रंथपरिचय चंद्रकांत कुळकर्णी
२४१	भारतीय कलेतील बुद्धाचा आविष्कार आत्माराम रावजी देशपांडे (अनिल)
२४४	'बी' कवींचे काव्यविषयक विचार डॉ. मा. गो. देशमुख
१	संघवार्ता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी प्राध्यापकांची परिषद

संपादकीय

मराठी राज्यभाषा व्हावी हे मराठी भाषिक जनतेचे फार दिवसाचे स्वप्न होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर ते स्वप्न साकार होण्याला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. पण हा फक्त प्रारंभ आहे. राज्यकारभारात संपूर्णपणे मराठीचा वापर होणे व शिक्षणाच्या अत्युच्च स्तरापर्यंत सर्व ज्ञानशाखांमध्ये संपूर्णपणे मराठी माध्यमाचा वापर होणे, हे उद्दिष्ट सफल होण्यासाठी अजून पुष्कळच मजल गाठावी लागणार आहे. हे उद्दिष्ट साध्य करून घेण्याच्या कामी विद्यापीठातील व महाविद्यालयीन प्राध्यापकांची जबाबदारी फार मोठी आहे. नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रातील मराठीच्या प्राध्यापकांमध्ये ही जाणीव मूळ धरू लागल्याची प्रचीती नुकत्याच वणी येथे पार पडलेल्या त्यांच्या परिषदेने दिली आहे.

सबंध महाराष्ट्रात अशा प्रकारची ही पहिलीच परिषद होती हे या मेळाव्याचे पहिले वैशिष्ट्य. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांनी कुलगुरू व उद्घाटक या नात्यानेच नव्हे तर मराठीचे नामवंत शिक्षक व श्रेष्ठ संशोधक म्हणून या परिषदेच्या कामात आत्मीयतेने भाग घेतला व मराठीच्या प्राध्यापकांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणारे बहुमोल मार्गदर्शन केले, हे वणीच्या अधिवेशनाचे दुसरे वैशिष्ट्य. विद्यापीठातील मराठी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व कला विभागाचे (आर्टस्) विद्याशाखेचे अधिष्ठाते डॉ. मा. गो. देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, व चर्चासत्रांच्या संचालनात आणि समारोपाच्या भाषणातही हेच सूत्र घट्ट धरून ठेवून प्राध्यापकांच्या विचारांना मोठी चालना दिली हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य.

पण या सर्व गोष्टींबरोबरच आणखी एक अत्यंत उल्लेखनीय व अभिनंदनीय वैशिष्ट्य हे की वणीच्या अधिवेशनात मराठीच्या बहुसंख्य प्राध्यापकांनी त्या विषयाचे अभ्यासक या नात्याने भाग घेतला व सामान्यपणे प्राध्यापकांच्या मेळाव्यात आर्थिक मागण्या, सवलती, अडचणी यांचा पाढा वाचला जातो तसे काहीही न करता सर्वस्वी शैक्षणिक दृष्टिकोनातून मराठीच्या अध्यापनाची चर्चा केली व अखेरपर्यंत ही पातळी कायम राखली. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापनपद्धती, परीक्षापद्धती व ग्रंथनिर्मिती आणि संशोधन यासंबंधीच सर्वांनी विचारविनिमय केला. कुलगुरूंचे उद्घाटनाचे भाषण, डॉ. मा. गो. देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण, मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचे भाषण, स्वागताध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांचे भाषण व सर्वच प्राध्यापक प्रतिनिधींची चर्चासत्रातील भाषणे यांचा सूर एकच होता. मराठीचे अध्ययन, अध्यापन, संशोधन यांचा दर्जा वाढला पाहिजे; मराठी भाषिकांच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्याचे सामर्थ्य आपल्या भाषेला प्राप्त झाले पाहिजे. मराठी भाषेच्या व साहित्याच्या अध्ययन—अध्यापनाच्या दृष्टीनेच नव्हे तर एकंदरीने शिक्षणक्षेत्रातील परिवर्तनाच्या दृष्टीने ही घटना खरोखरच अत्यंत स्वागतार्ह आहे.

एका परीने पाहाता ही परिषद भरविण्याला फार उशीरच झालेला आहे. परिषदा, सभा, समेलने, परिसंवाद, चर्चासत्रे यांचा सुळसुळाट असलेल्या या काळात मराठीचे प्राध्यापक आजवर स्वस्थ का होते हाच प्रश्न वस्तुतः या प्राध्यापकांनी स्वतःला व इतरांनी त्यांना विचारला पाहिजे. दुसरे असे की एका परिषदेने काम झाले किंवा प्रारंभ उत्तम झाला म्हणून पुढेही सातत्याने व चिकाटीने काम होत राहील अशी खात्री बाळगण्याजोगे वातावरण आपल्या देशात नाही. शिवाय हा प्रश्न नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्राध्यापकांपुरता मर्यादित नाही. महाराष्ट्रातील सर्वच मराठीच्या प्राध्यापकांनी, व महाराष्ट्राबाहेरही दिल्ली, बनारस, बडोदे, इंदूर, ग्वाल्हेर, विक्रम, सागर, जबलपूर, उस्मानिया, वगैरे ज्या विद्यापीठांमध्ये मराठी शिकविले जाते त्या सर्व ठिकाणच्या प्राध्यापकांनी वारंवार एकत्र येऊन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अध्ययन, अध्यापन व संशोधन यासंबंधी सतत विचारांची देवाणघेवाण केली पाहिजे. फार काय लंडन, मास्को, लेनिनग्राद, वगैरे परदेशातील ज्या विद्यापीठांमध्ये मराठीचे अध्ययन–अध्यापन होते तेथील मराठीच्या प्राध्यापकांशी व अभ्यासकांशी सतत संपर्क राखून त्यांनाही या परिषदांना निमंत्रण दिले पाहिजे.

वस्तुत: हे कार्य विद्यापीठांचे व मराठी साहित्य महामंडळासारख्या संस्थांचे आहे. साहित्य संमेलने हा एक वार्षिक सोहाळा आहे व मराठी भाषिकांच्या सास्कृतिक जीवनात तो स्थिरावला आहे. ज्याला जसा जमेल व साधेल तसा त्याने तो साजरा करावा, त्याबद्दल तक्रार येथे करावयाची नाही. पण अध्ययन, अध्यापन, संशोधन यासंबंधीच्या गंभीर चर्चेला ते व्यासपीठ आज तरी उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. मराठीचे प्राध्यापक या संमेलनात पुष्कळ असतात, पण अध्ययन-अध्यापनाचे प्रश्न तेथे येऊ शकत नाहीत, त्यासाठी प्राध्यापक परिषदांसारखेच व्यासपीठ हवे. विद्यापीठे व साहित्यसंस्थांनी ते व्यासपीठ निर्माण केले पाहिजे. पण अखेर विद्यापीठे किंवा साहित्यसंस्थांतून तरी हे करणार म्हणजे प्राध्यापकच. वणीच्या परिषदेच्या निमित्ताने प्राचार्य शेवाळकर व त्यांच्या सहकार्यांनी मिळून उत्साहाने जे कार्य पार पाडले ते आता नैमित्तिक काम न राहाता नित्याचे कार्य झाले पाहिजे.

अध्यापनासंबंधी पद्धतशीर प्रशिक्षण हा विचार अजूनपर्यंत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणापुरताच मर्यादित होता. आता हळूहळू महाविद्यालयीन प्राध्यापकांना ही कल्पना पटू लागली आहे— पण फार हळू! विज्ञानाचे अध्यापन, इंग्रजीचे अध्यापन, यांबाबत काही तरी विचार होतो, चर्चासत्रे होतात, अभ्यासवर्ग होतात, पण मातृभाषेच्या अध्यापनाबाबत ते होत नाही. मराठीच्या प्राध्यापकांच्या प्रशिक्षणाचे स्वरूप विज्ञानाच्या किंवा इंग्रजीच्या अध्यापनाच्या प्रशिक्षणापेक्षा निराळे असू शकेल, पण अध्यापनपद्धती, संशोधनाच्या पद्धती वगैरेसंबंधी चर्चासत्रे, परिषदा, अभ्यासवर्ग हेही महत्त्वाचे शैक्षणिक कार्य मानले जावे यासंबंधी दुमत असण्याचे कारण नाही. राज्य सरकारचे साहित्य संस्कृती मंडळ, भाषा विभाग आणि मराठी साहित्य महामंडळ व त्यांच्या घटकसंस्था, आणि अर्थात्‌च विद्यापीठे, या सर्वांच्या सहकार्याने हे कार्य मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे. नागपूर विद्यापीठातील मराठीच्या प्राध्यापकांच्या परिषदेप्रमाणेच इतर विद्यापीठातील मराठीच्या प्राध्यापकांच्या परिषदा वारंवार होत गेल्या व सर्व विद्यापीठांतील मराठीचे प्राध्यापक एकत्र येत गेले तर हे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल. या दृष्टीने वणीच्या परिषदेने मराठीच्या अध्यापनासंबंधीच्या विचारांना चालना दिली आहे यात शंका नाही.

वणीच्या मराठी प्राध्यापक परिषदेतील आणखी एका औचित्यपूर्ण उपक्रमाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. या परिषदेत नागपूर विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक डॉ. अ. ना. देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. या सत्काराला एक विशेष अर्थ होता. हा फक्त एका व्यक्तीचा सत्कार नव्हता, तो त्या पदाचा आणि ते पद नव्यानेच निर्माण करणाऱ्या नागपूर विद्यापीठाचाही गौरव होता. आजवर नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर विभागात मराठीला विभागप्रमुख होते, 'प्रोफेसर' नव्हते, 'प्रोफेसर' चे पदच अस्तित्वात नव्हते. मराठीलाच नव्हे, संस्कृत, हिंदी, इंग्रजी या भाषांच्या विभागांनाही असे अध्यासन नव्हते. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, प्राचीन इतिहास व संस्कृती या विभागांना अध्यासने होती, विज्ञान व तंत्रशास्त्रातही 'प्रोफेसर' होते, पण भाषा व साहित्य यांच्या विभागांना तो दर्जा व ती प्रतिष्ठा नव्हती. डॉ. कोलते यांनी कुलगुरू होण्यापूर्वी अनेक वेळा यासंबंधी खंत व्यक्त केली होती व कुलगुरुपदावर येताच त्यांनी याबाबत नेटाने प्रयत्न करून ही अध्यासने निर्माण केली व भाषा व साहित्यविभागांचे महत्त्व प्रस्थापित केले. वणी परिषदेत सत्कार झाला तो या अध्यासनाचा– व मराठी अध्यासनाचे पहिले मानकरी या नात्याने डॉ. अ. ना. देशपांडे यांचा.

याच संदर्भात 'युगवाणी'च्या वतीनेही आम्ही व्यक्तिश: डॉ. अ. ना. देशपांडे यांचे व ते ज्या अध्यासनाचे पहिले मानकरी आहेत ते अध्यासन निर्माण केल्याबद्दल नागपूर विद्यापीठाचे व कुलगुरु डॉ. कोलते यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. आता यापुढची अपेक्षा ही की विद्यापीठाच्या मराठी विभागाकडून मराठीचे अध्ययन, अध्यापन, संशोधन, मराठी माध्यमातून ग्रंथनिर्मिती, वगैरे बाबतीत भरीव कामगिरी व्हावी व मराठीच्या सर्व जुन्यानव्या प्राध्यापकाना व अभ्यासकांना सतत मार्गदर्शन व प्रेरणा मिळावी. डॉ. कोलते यांच्या सारखे मराठीचे ज्येष्ठ प्राध्यापक व संशोधक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विद्यापीठाचे कुलगुरु आहेत हा मोठा सुयोग आहे. कुलगुरु या नात्याने अर्थातच त्यांचे क्षेत्र मराठीपुरतेच मर्यादित नाही. सर्व ज्ञानशाखा त्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. व त्या बाबतीत सर्वांना प्रोत्साहन देण्याचे कार्य ते करी-तही आहेत. मराठी प्राध्यापक परिषदेला त्यांनी प्रोत्साहन दिले तसेच ते इतिहास, राज्यशास्त्र, विज्ञान, इंग्रजी, हिंदी, वगैरे विषयांच्या प्राध्यापकांच्या परिष-दांना व मेळाव्यांनाही प्रोत्साहन देतात. पण मराठीचा त्यांच्यावर व त्यांचा मराठीवर अर्थातच अधिक लोभ व म्हणूनच अधिक हक्क आहे. त्या दृष्टीने त्यांच्या कारकीर्दीत मराठीचे कार्य अधिक नेटाने व जोमाने पुढे जाईल व विद्यापीठातील मराठी विभाग अधिक गतिमान होईल अशी अपेक्षा आहे. सुदैवाने विद्या-पीठातील कला शाखेचे अधिष्ठाते (आर्ट्‌स फॅकल्टीचे डीन) डॉ. मा. गो. देशमुख हेही मराठीचेच ज्येष्ठ अध्यापक व संशोधक आहेत व वणीच्या परिषदेचे अध्यक्षपद त्यांनीच भूषविले होते. तेव्हा कुलगुरु, कला शाखेचे अधिष्ठाते व नव्या अध्यासनावर अधिष्ठित झालेले विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख या सर्वांच्या मार्गदर्शनाने मराठीच्या अध्यापनाच्या कार्यात नवे चैतन्य निर्माण होईल व नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रात मराठीची दुंदुभि गाजत राहील अशी आशा आहे.

x x x x x

या निमित्ताने आणखी एक अपेक्षा. ती युगवाणी'च्याच बाबतीत. 'युगवाणी' हे विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र म्हणून नियमितपणे प्रसिद्ध होत असले व वेळोवेळी 'युगवाणी' तून पुष्कळच मौलिक साहित्य प्रकाशित झालेले असले तरी अजून मराठीच्या प्राध्यापकांमध्ये व अभ्यासकांमध्ये 'युगवाणी' आपलेच मासिक आहे अशी आत्मीयतेची भावना सार्वत्रिक दिसून येत नाही हे मान्य केले पाहिजे. ते व्हायला हवे हे उघड आहे. त्या दृष्टीनेच डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. द. भि. कुळकर्णी व प्राचार्य भाऊ मांडवकर यांना संपादक मंडळावर येण्याची विनंती करण्यात आली व आता त्यांच्या सह-कार्याने हे उद्दिष्ट तडीस जावे असा प्रयत्न आहे. अर्थात् या कार्यात मराठीच्या सर्व जुन्यानव्या अध्यापकांचे, अभ्यासकांचे व संशोधकांचे सक्रिय सहकार्य लाभले तरच ते शक्य आहे. वणीच्या परिषदेत 'युगवाणी'च्या वतीने असे सहकार्य देण्याची जाहीर विनंती सर्व प्राध्यापकांना करण्यात आली. तिचाच आम्ही येथे पुनरुच्चार करतो व या विनंतीला उत्साहाने प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

शेवटी एक व्यावहारिक विनंती. 'युगवाणी' हे वि.सा. संघाचे मुखपत्र या नात्याने सर्व समासदांकडे जाते परंतु सर्व शिक्षणसंस्थांत व ग्रंथालयांत 'युगवाणी' जात नाही, त्यामुळे 'युगवाणी' तील साहित्य मराठीच्या अनेक अभ्यासकांना उपलब्ध होत नाही. त्यासाठी सर्व शिक्षणसंस्थांच्या व ग्रंथालयांच्या चालकांनी 'युगवाणी'चे वर्गणीदार व्हावे अशी आग्रहाची विनंती आहे. मराठीच्या प्राध्यापकांनी या कामी लक्ष घातले तर हे सहज होण्या-जोगे आहे. ते हे श्रेय घेतील व वैयक्तिकरीत्याही वि. सा. संघाचे सदस्य होऊन 'युगवाणी' वर वाढता लोभ व्यक्त करतील असा विश्वास वाटतो.

[श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) व डॉ. मा. गो. देशमुख यांचे या अंकात प्रसिद्ध होत असलेले लेख डॉ. कोलते गौरवग्रंथ या प्रा. मधुकर आष्टीकर यांनी संपादित केलेल्या आगामी प्रकाशनात समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संपादक युगवाणी]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(उत्तरार्ध)

मराठीतील आद्य महाकाव्य

डॉ. द. भि. कुळकर्णी

४. मुळातच रूक्मिणी-स्वयंवराची कथावस्तू घटना-वहुल नव्हे; त्यात नरींद्राचे काव्य तर सुदेव द्वारकानगरीत प्रवेश करता करताच अपुरे राहते. परंतु उपलब्ध काव्यावरूनही महाकाव्यास आवश्यक असलेला विस्तार साधण्याचे कौशल्य कवोपाशी आहे याची प्रचीती येते. रुक्मिणीवर्णन, किन्नरवर्णन, किन्नराने वर्णन केलेले विविध देशीचे राजे, रुक्मिणीची विरह-व्यथा, त्यावरील विविध उपचार, द्वारकावर्णन या सर्व स्थळी कवीने महाकाव्यास शोभेल असा कथाविस्तार केला आहे.

नगरार्णवशैलर्तुचंद्रार्कोदयवर्णनेः
उद्यानसलिक्रीडा मघुपान रतोत्सर्वैः
विप्रलंभैर्विवाहैश्वाल कुमारोदयवर्णनैः
मंत्रदूतप्रयाणाजिनायकाभ्युदयैरपि [२१]

असे काव्यशास्त्राने सांगितले म्हणून बळजबरीने नगर, समुद्र, पर्वत, ऋतू, चंद्रसूर्य यांचे उदयास्त, उपवन, जलक्रीडा, मघुपान, प्रेमोत्सव, विरहजन्य प्रेम, विवाह, कुमारोत्पत्ती, विचारविमर्श, राजदूतत्व, अभि-यान, युद्ध, नायकाचे विजय इत्यादी घटक नरींद्राने आपल्या काव्यात आणलेले नाहीत; तर यापैकी जे घटक कथाप्रवाहात अपरिहार्य ठरले त्यांनाच कवीने आपल्या काव्यात स्थान दिले. श्रीगणेश-निर्वचन (१–५), श्रीशारदा-निर्वचन (६–१३), रुक्मिणीची विरहावस्था व त्यावरील विविध उपचार (३७८–४४६; ५२६–६७४), अस्ताचळावरील सूर्याचे वर्णन (४६७-४७०), संघ्याकाळचे वर्णन (७२१–४८८), चंद्रोदय (४८९–५१७), उपवनवर्णन (७२१–७३२; ७७८–८३९), कुमारींचा वनविहार (८४०–९४९), द्वारकावर्णन (८५५–८७९) ही त्याची उदाहरणे होत.

: २ :

कथाविकासाचे टप्पे लक्षात घेता नरींद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवर' या महाकाव्याचे पुढील विभाग पडतात.

१. प्रास्ताविक

या विभागात 'श्रीगणेश-निर्वचन' (१-५), 'श्रीशारदा-निर्वचन' (६–१३), 'कथारंभ' (१४–२७) वेदादी सकळ शास्त्रांना ईश्वरज्ञान नाही' (२८–३२), 'कवित्वाची रंकवृत्ती' (३३–३७), 'श्रोते जाणते असले तर कवित्वाचे चीज होते (३८–४२), 'श्रीकृष्णचरित्र, मराठी भाषा व भागवत यांची प्रशंसा (४३–४९) व 'कथामहत्व' (५०–५१) या आठ काव्यखंडाचा समावेश होतो.

२. रुक्मिणीप्रधान पूर्वार्ध

या विभागांत 'भीमक-गुण-वर्णन' (५२-६३), भीमकाचा गृहपरिवार(६४-६६)'रुक्मिणीचे वर्णन'(६७-७४), 'कथेची शोघणी व रुक्मिणीचे सभेत आगमन' (७५-७७), 'रुक्मिणीच्या सख्यांचे वर्णन' (७८–८५), 'रुक्मिणीचे वर्णन' (८६-१०१), 'रुक्मिणीच्या सेविका' (१०२-१०७), 'रुक्मिणीचा सभाप्रवेश' (१०८-११४), 'भीमकाची विवाहचिंता' (११५-१२६), 'कल्याण-कीर्ती भाटाचे आगमन' (१२७–१३४), 'स्वस्ति-वचन' (१३५-१३७), 'रुक्मिणीचे रूप पाहून भाटास वाटलेले आश्चर्य (१३८-१४७), 'पाहुणचार व राजाची पृच्छा' (१४८-१५१), 'भाटाचे उत्तर व किन्नराचे वर्णन' (१६२–१६), 'किन्नराविषयी सभेतील लोकांचे तर्क (१६३–१६७), 'किन्नराचे स्वरूप' १६८–१७३), 'गायनाचा उपक्रम'

---

[२१]. दण्डी काव्यादर्श, १–१६, १–१७.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१७४-१७९), 'त्रैलोक्यातील गायन-प्रकार' (१८०-१०८, 'ग्रंथमहिमा व रुक्मिणीचे सौंदर्य-वर्णन' (१८९-१९६) या १९ काव्यखंडाचा समावेश होतो. प्रस्तुत विभागास 'रुक्मिणीप्रधान' म्हटले असले तरी त्यात कल्याणकीर्तीकिन्नर यांचे महत्त्वाचे उपाख्यान आलेले आहे.

३. श्रीकृष्णप्रधान मध्य

'रुक्मिणीला योग्य वर म्हणून देवांची अपात्रता' (१९७-२०३), 'पाताळातील वरांची अपात्रता' (२०४-२०७), 'सप्त-द्वीपातील वरांची अयोग्यता' (२०८-२०९), 'जंबु-द्वीपातील राजे' (२१०-२३३), 'पूर्व आणि ईशान्य दिशेचे राजे (२३४-२५४), 'दक्षिण दिशेकडील प्रदेश व राजे' (२५५-२७२), 'पश्चिम दिशेचे राजे' (२७३-२८८), 'यादववीर बळराम व श्रीकृष्ण यांचे वर्णन' (२८९-२९८), 'श्रीकृष्णाची थोरवी' (२९९-३१९), 'श्रीकृष्णाच्या सौंदर्याचे वर्णन' (३२०-३४२), 'किन्नराची प्रशस्ति व बोळवण' (३४३-३५३), 'भाटाचा आशीर्वाद व निरोप' (३५४-३६०), रुक्मीने केलेली कृष्ण-निंदा व शिशुपाल-प्रशंसा (३६५-३७४), 'विवाहाचा निश्चय व आमंत्रणे (३७५-३७७) हे १४ काव्यखंड तिसऱ्या 'श्रीकृष्णप्रधान मध्य' या विभागात समाविष्ट होतात.

४. रुक्मिणीप्रधान उत्तरार्ध

'रुक्मिणीचा शीण' (३७८-३८०), 'रुक्मिणीची विरहावस्था' (३८१-३८८), 'रुक्मिणीला मूर्च्छा व सख्यांची गजबज (३८९-३९३), 'सावध करण्याचे उपचार (३९५-३९९), 'सख्यांचे तर्क (४००-४०३), 'रुक्मिणीचे निवारण (४०४-४०५), 'भावकळनेचा तर्क व विरहोपचाराचा प्रारंभ' (४०६-४१४) 'धारा-दामोधराचे वर्णन' (४१५-४४०), 'भावकळनेची विनंती' (४४१-४४३), 'उठताना झालेली रुक्मिणीची अवस्था' (४४४-४६६), 'अस्ताचळावरील सूर्याचे वर्णन' (४६७-४७०), 'सायंकालीन अंधःकार' (४७१-४७५), 'सायंकालीन कार्ये' (४७६-४८१), 'दिव्यांचे वर्णन' (४८२-४८५), 'नक्षत्रांची शोभा' (४८६-४८८), 'चंद्रोदय' (४८९-५०२), 'चंद्राच्या कलांचे कार्य' (५०३-५०९), 'चांदण्याच्या शुभ्रत्वाचे वर्णन' (५१०-५१७), 'रुक्मिणीचा सख्यांना टोमणा' (५१८-५१९), 'द्राक्षमंडपातील किरणांची शोभा' (५२१-५२४), 'चंद्रोदयामुळे झालेली रुक्मिणीची तगमग' (५२५-५३५), 'विरहोपचार' (५३६-५७२), 'विरहा-वस्थेचा चढ' (५७३-५७६), 'रुक्मिणीला आपल्या शरीरावयवामुळे आलेला दचक' (५७७-५८५), 'सख्यांनी केलेले रोगाचे निदान' (५८६-५९२), 'उपचारांचे प्रकार' (५९३-६०३), 'भावकळनेची चिंता' (६०४-६०५), 'पक्षांचे शकुन' (६०६-६२२) 'कारण सांगण्याविषयी प्रधानिकेचा आग्रह' (६२३-६२८), 'रुक्मिणीचे हृद्गत (६२९-६४४) या तीस काव्यखंडाचा समावेश सदर चौथ्या विभागात होतो.

५. दृश्यवर्णनप्रधान अखेरी

या विभागात 'सुदेवाला बोलविण्याची कल्पना' (६५५-६४८), 'सुदेवाजवळ विरहावस्थेवरील उपायाची विचारणा' (६४९-६६७), 'सुदेवाने सुचविलेली युक्ती' (६६८-६७४), 'रुक्मिणीपत्रिका' (६७५-६८५), 'सुदेवाची पाठवणी' (६८६-६९०), 'परिवारासहित सुदेवाचे मार्गक्रमण (६९१-७०७). 'द्वारका-दर्शन व अभिवंदन' (७०८-७१४), 'द्वारकेभोवतीचा खंदक' (७१५-७२०), 'वनोपवनाचे वर्णन' ७२१-७३२), 'वनोपवनातून वसंतऋतूचा विलास' (७३३-७७१), 'श्रीकृष्णाच्या स्वागतार्थ वनदेवतांची तयारी' (७७२-७७७), 'द्वारकेच्या वनोपवनातील वृक्षांचे वर्णन' (७७८-८०४), 'उद्यानातील इतर वनस्पती (८०५-८१८) 'वनस्पती व वनदेवता यांचा संवाद' (८१९-८३२), 'देवांनी घेतलेल्या वृक्षावताराची वर्णने' (८३३-८३९), 'यादवकुमारीचा वनविहार' (८४०-८४९) 'सुदेवाचा द्वारकेत प्रवेश' (८५०-८५४), 'द्वारकानगरीचे दृश्य' (८१५-८३३), 'नगराभोवतीची पौळी' (८६४-८६७), 'त्यातील दरवाजे' (८६८-८७१), 'इतर पौळीचे वर्णन' (८७२-८७९ अपूर्ण) या २१ काव्यखंडाचा समावेश होतो.

या तपशिलावरून 'रुक्मिणी-स्वयंवरा'च्या कथा-प्रवाहाचे स्वरूप लक्षात येते प्रस्तुत महाकाव्याचा अधिकांश भाग रुक्मिणीशी साक्षात निगडित आहे. 'रुक्मिणीप्रधान पूर्वार्ध' व 'रुक्मिणीप्रधान उत्तरार्ध' या दोन विभागांवरून व काव्यनामावरूनही ते स्पष्ट

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

होते. महाकाव्य नायकप्रधान असावे व महाकाव्याचा नायक सर्वगुणसपन्न, महानवीर, विजिगीषु, नीतिज्ञ आणि कुशल राजा असावा. (तंत्र त्रिवर्णसक्त समृद्ध-शक्तियं च सर्वगुणम्. रक्तसमस्तप्रकृति विजिगीषुं नायकं न्यस्येत् ॥ ६–८, काव्यालंकार) असे रूद्रटाने म्हटले आहे; आणि सदर महाकाव्य तर नायिकाप्रधान आहे. असा आक्षेप घेता येईल का ? तसे वाटत नाही. एकतर प्रस्तुत महाकाव्य अपूर्ण आहे–सुदेव–श्रीकृष्णभेट, श्रीकृष्णाचे कौडिण्यपुराकडे प्रयाण, प्रवासातील विविध प्रसंग, रुक्मिणीहरण, शिशुपाळ आदी वीरांचा पराभव इत्यादी प्रसगी श्रीकृष्णाच्या पात्राला विशेष उठाव मिळाला असता. दुसरे, भीमक, रुक्मी, रुक्मिणी व किन्नर या सगळ्यांचे मोहरे, वेगवेगळ्या भूमिकेवरून पण श्रीकृष्णाकडेच आहेत. अखेरचा वसंतऋतुवर्णनपर, द्वारकानगरीवर्णनपर इत्यादी भागही साक्षात श्रीकृष्णाशीच निगडित आहेत. म्हणूनच 'महाकाव्य नायकप्रधान असावे' या संस्कृत संकेताला बाध येईल असे 'रुक्मिणी-स्वयंवरा'चे स्वरूप नाही. (आणि असते तरी बिघडले असते असे नाही !)

नरींद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'चे एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यातील अभिजात कल्पनाविलास.

अ. रुक्मिणी-स्वयंवरकथेचे रमणीयत्व सांगताना कवीने भागवतपुराणास सागर, त्यातील दशम स्कंधास चंद्र व रुक्मिणी-स्वयंवरकथेस चांदणे संबोधले आहे. समुद्रमंथनप्रसंगी सागरातून (भागवत पुराण) चंद्र (दशमस्कंध) निघाला व त्या चंद्राचे सारे सौंदर्य (रुक्मिणी-स्वयंवरकथा) चांदण्यांत एकवटलेले असते असा त्याचा भावार्थ आहे.[२२]

आ. रुक्मिणीचे वर्णन करताना कवी म्हणतो, रुक्मिणी म्हणजे कोण ? तर श्रीकृष्णाचे स्मरण करीत असताना क्षीरसागराच्या अंतःकरणानेच घेतलेले मानवरूप.[२३]

इ. रुक्मिणीचे अद्वितीय लावण्य पाहून देशोदेशी हिंडून आलेला माटही थक्क झाला. आणि म्हणाला की, हे सुंदर रूप आहे की निखळ सौंदर्यच इथे मूर्त झाले आहे ? की शंकराच्या भयाने मदनाने स्त्रीवेषाचा बुरखाच पांघरला आहे ?[२४]

ई. ज्या ओवीला रामदेवरायाने दाद दिली त्या ओवीतही अशीच एक सुंदर कल्पना आली आहे. श्रीकृष्णाच्या पराक्रमाची आच सहन न होऊन सातही सागर मागे सरले आणि खंडणी म्हणून त्यांनी आपल्या उदरातील भूमी–द्वारका–श्रीकृष्णाला वहाल केली.... 'या ग्रंथाचा आस्वाद मज द्यावा' असे कुणासही वाटावे अशीच ही कल्पना आहे.[२५]

उ. तीक्ष्ण बाणाने चंदनाची कोवळी वेल सहजगत्या छाटली जावी तसे, किन्नराच्या तोंडून श्रीकृष्ण-प्रशंसा ऐकून रुक्मिणीचे अंतःकरण विद्ध झाले.[२६].

ऊ. रुक्मिणी विरहव्यथेने मूर्छित पडल्यावर भावकळना तिच्या अंगावर अगदी तलम, झुळझुळीत शेला घालते. तो कसा भास होता ? सुवर्णकमळाच्या कळीवरील परिमळासारखा– असे कवीने त्याचे व्यंग्यार्थपूर्ण वर्णन केले आहे.[२७]

---

२२. तो पुराणांतूल आनंद सुमुद्र :
तेथ दशम स्कंद तोचि चद्
ते चांदिणे सांघेन म्हणे नरिंद्र :
रुक्मिणी-सैंवर ४९

२३. ते हृदय क्षीरसागराचे :
ध्यान करीत होते देवाचें
तेंचि मूर्तिसि आलें साचे :
माणूसपणचिये ६९

२४ तो म्हणे 'हे काई साचोकारे रूप'
कीं गाळिवा सौंदर्याचे लेप
कीं कुमारि–पणाची घेतली खोप
अनंग रूद्रा–भेण १४०

२५ देवाचेया दादुलेपणाचा उबारा
न साहेचि सातांहि सागरां
वोसरोनि राजमरा
दीधली द्वारावती ३१२

२६ चंदनाची आवधि कुवारी :
बाणे कापली राहे वरिचा वरि
तैंसी ते राजकुमरी :
देवाचीया अवस्था ३४४

२७ अवएवी सीरे ऐसा विल्हळु :
तो फुटा पांगुरविला पातळु
जैसा कळिकेवरि परिमळु
कनक – कमळांचीये ४०७

ए. नगरातील दीपशोभेचे वर्णन करताना कवी म्हणतो, हे दिवे म्हणजे [संध्यावेळेकडून] संधीप्रकाशाची रात्रीने वसूल केलेली खंडणीच होय किंवा भयानक तमाने आकाशावर हल्ला चढविल्यामुळे भयभीत झालेल्या विदुल्लतांचे गळून पडलेले गर्भच होत. [१८]

—कविच्या तरल कल्पकतेची अशी किती उदाहरणे द्यावी ? सारे काव्यच अशा अनुपम कल्पनाविलासाने नटले आहे. कुठल्याही कवीजवळ कल्पकता ही हवीच; पण महाकवीस तिची फार गरज असते. भावकवी आत्मविष्कार व उत्कट भावना यांच्यावर भागवू शकतो; आख्यानक कवीपाशी गतिशील निवेदन हवे असते; परंतु महाकवीला साक्षात आत्मविष्कार शक्य नसतो व गतिशील निवेदनापेक्षा त्यास सविस्तर व सालंकृत निवेदनाची गरज असते. अशा प्रसंगी त्याच्यापाशी असाधारण कल्पनाशक्ती नसेल तर त्याचे निवेदन कंटाळवाणे, पाल्हाळिक व कृत्रिम होते. महाकवी नरींद्राची कल्पकता जन्मजात असावी इतक्या त्याच्या कल्पना सहजस्फूर्त व चपखल असतात. नरींद्रावर अभिजात साहित्याचे संस्कार झालेले होते. विशेषत: १२ व्या शतकातील श्रीहर्षाच्या ' नैषधीयचरिता' चा १३ व्या शतकातील नरींद्रावर विशेष संस्कार दिसतो. [१९] चक्रधरस्वामींनी 'श्रीकृष्णचरित्रा'त किन्नराचे वर्णन

सुमारे २० ओळीत केले आहे. तेही किन्नराचे रूपवर्णन नसून त्याच्या पूर्वकथेचे वर्णन आहे. नरींद्राने मात्र ओवीक्रमांक १५३ पासून ओवीक्रमांक १८८ पर्यंतच्या ३६ ओव्यांत किन्नराचे सविस्तर वर्णन केले आहे. महाकाव्यप्रकारास अनुकूल असाच हा विस्तार आहे. त्यात किन्नराची पूर्वकथा, किन्नराचे रूप, किन्नराचे गायन इत्यादी तपशील आलेला आहे. या तपशिलाचे 'नैषधीयचरितां'तील हंसवर्णनाशी साम्य आहे. श्रीहर्षाचा हंस ब्रम्हदेवाचे विमान वाहून नेणाऱ्या हंसाच्या कुळातील असतो. (नैषधीयचरित ३–१६). स्वर्ग व पृथ्वी या दोनही लोकांत त्याचा संचार असतो (नैषधीयचरित ३-१८). त्याने अनेक देश पाहिलेले असतात (नैषधीयचरित २–४०) व कथा सांगण्यात तो चतुर असतो (नैषधीयचरित ३–४२–४४). किन्नराच्या अंगीही हे सारे गुण आहेत. नरींद्राचा किन्नर तर ब्रम्हदेवाच्या हंसाहूनही सरस आहे.

मागध रायासी वोले ऐसे
हा पक्षिया गरूडा – पासोनि दीसे
ब्रम्हेयाचिया हंसाते हासे
आरिखाचा म्हणोनिया १६१

श्रीहर्षाचा हंस स्वर्ग–पृथ्वीवर संचार करतो तर, नरींद्राचा किन्नर 'हा तिही लोकी राहाटे चतुरू' (१५५) असा आहे. 'हा वोली ब्रम्हेया नुमाने : याचा ठाई आति शब्द–सृष्टीचे नाणे' (१६०) असे त्याच्या वाणीचे सामर्थ्य आहे.

रुक्मिणी – वर्णन (६७–७४, ८६–१०१, १९६) रुक्मिणीची विरहावस्था (३७८–४१४, ४४४–४६६, ५२५–५३५) आणि विरहज्वरावरील उपचाराचे वर्णन (५३६–६०३) इत्यादी वर्णने वाचतांना नैषधीयचरितातील दमयंतीवर्णनाचे स्मरण होते.

श्रीहर्षाच्या 'नैषधीयचरिता' चा 'रुक्मिणी स्वयंवरा' वर विशेष संस्कार होण्याचे कारण काय असावे ? डॉ. वाटवे यांनी याबाबत एक तर्क केला आहे : नरींद्राच्या नृसिंह या बंधूने 'नलोपाख्यान' नावाचे काव्य लिहिले होते, ते नरींद्राच्या नजरेसमोर असावे असा डॉ. वाटवे यांचा तर्क आहे. [३०]

'नैषधीयचरिता' चा संस्कार नरींद्रकाव्यावर दिसत असला तरी श्रीहर्षाचे अंधानुकरण नरींद्राने कुठेही केलेले नाही. श्रीहर्षाच्या 'नैषधीयचरिता' त अद्वैतमतनिष्ठा, शृंगारप्राधान्य, पाल्हाळ, विनोद, ग्राम्यता व श्लेषालंकाराचा हव्यास हे गुणदोष आढळतात. यापैकी एकही गुणदोष नरींद्राच्या 'रुक्मिणीस्वयवरा' तआढळत

---

[१८] सांजवेळ जिनोनि मेहेलनी : आणि संध्या – रागाची वोपणी की विजूचे गर्भ गळिनले घरणी : धाडि गडदेचिया ४८५.

[१९] अ. के. ना. वाटवे, १९४७, संस्कृत काव्याचे पंचप्राण, पृ. क्र. ७६.
आ. सुरेश म. डोळके, एप्रिल–मे जून १९५६, महाराष्ट्र साहित्य–पत्रिका, 'नरींद्राचा प्रतिभाविलास' पृ. क्र. २०–२५.
इ. के. ना. वाटवे, १९६४, प्राचीन मराठी पंडिती काव्य, पृ. क्र. १२३-१२४.

[३०]. के. ना. वाटवे, १९६४, प्राचीन मराठी पंडिती काव्य, पृ. क्र. १२३.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. यावरून नरींद्राने श्रीहर्षाचे अंधानुकरण केलेले नाही हे स्पष्ट होते.

'अस्ताचळावरील सूर्याचे वर्णन' (४६७-४७०) 'सायंकालीन अंधःकार' (४७१-४७५), 'सायंकालीन कार्ये' (४७६-४८१), 'दिव्याचे वर्णन' (४८२-४८५), 'नक्षत्रांची शोभा' (४८६-४८८), 'चंद्रोदय' (४८९-५०२), 'चंद्राच्या कलांचे कार्य' (५०३-५०९), 'चांदण्याच्या शुभ्रत्वाचे वर्णन' (५१०-५१७) 'द्वारकानगरीवर्णन' (७०८-७१४, ८५५-८७९ अपूर्ण), द्वारकासमुद्रवर्णन' (७१५-७२०), 'द्वारकोपवनवर्णन' (७१२-७१३, ७७८-८१८), 'द्वारकोपवनातील वसंतऋतू' (७३३-७७१) इत्यादी वर्णनप्रसंगी हर्षकाव्याचे संस्कार नाहीत; संस्कृतातील लिखित महाकाव्यपरंपरेत शोभून दिसतील अशी ही वर्णने आहेत. विशेषतः पाच ओव्यांमध्ये आलेले सायंकालीन अंधाराचे वर्णन नरींद्राच्या अभिजात प्रतिभेचा साक्षात्कार घडविणारे आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सदर महाकाव्याचा वाचकाच्या मनावरील संस्कार हा पूर्णपणे अभिजात साहित्याचा संस्कार आहे. वास्तववादी साहित्यवाचनाने वाचकास वास्तवातील सुंदराचे व असुंदराचे अधिक सूक्ष्म भान येते; स्वच्छंदवादी साहित्याच्या आस्वादाने एका भावाकुल मनाची सूक्ष्मतर स्पंदने वाचकास प्रतीत होतात; तर अभिजातवादी साहित्याच्या रसनेने, ज्या सृष्टीला वास्तवात किंवा व्यक्तिमनात अस्तित्व नाही अशा, एका अपर काव्यसृष्टीचा प्रत्यय यावयास हवा असतो. श्रीकृष्ण व रुक्मिणी यांचे अलौकिक सौंदर्य, श्रीकृष्णाच्या विरहाने रुक्मिणीच्या हातातील विडाही पेटावा व त्या ज्योतीनेच तिने श्रीकृष्णास ओवाळावे असा तिचा लोकविलक्षण विरहज्वर, सूर्यास्त, चंद्रोदय, समुद्र, उपवन यांची कवीने केलेली कल्पनापूरित वर्णने हे सारे वास्तवनिष्ठ किंवा आत्मनिष्ठ आहे असे कोण म्हणेल ? हे सारेच काव्यपरंपरा, काव्यसंकेत व कवी-रसिक यांची कल्पकता यांच्यावर आधारित आहे. म्हणूनच प्रस्तुत महाकाव्य वाचीत असताना लौकिक पातळीवरून वर गेल्यासारखे वाटते.

कवीने जी उपमाने वापरली आहेत तीही या अ-लौकिक प्रत्ययास पूरक अशीच आहेत. अगरू, अंजन, अनंग, अनंगचाफा, अवुज, आमोद, आल्हात (पिचकारी), इंद्रमणी, कनक, करंडी, कापूर, कलहंस, कांडारीव [नक्षीदार], कानीव, कालिंदी, कास्मीर (स्फटिक), कुंकुम, केका, गोपुर, चवरी, चिनांसुक, जवादी (कस्तुरी), ठकार (सुंदर) डोळी, तुषार, वत्रळार, पाच फुलौरा, माणिक, सिंप, मालखंड, वारीक्ष, क्षीर-द्राक्ष इत्यादी शब्द काव्यात वर्णनाच्या किंवा उपनामाच्या निमित्ताने आले आहेत; त्यावरूनही काव्यातील वातावरण कसे काव्यात्म, तरल व रमणीय आहे याची कल्पना येते. मीठ-मिरची, चूल-वोळके, शिवण-टिपण, नांगरणी-पेरणी, गावस्की-देवस्की इत्यादी शब्द वा कल्पना उप-मानदिकांच्या निमित्तानेही आल्या असत्या तरी काव्याचे अभिजात वातावरण गढूळ झाले असते; कवीने यात्रात्रत पुरेपूर दक्षता घेतलेली दिसते.

भागवतातील कथेला नरींद्राने किन्नराच्या उपाख्यानाची जोड दिली त्यामागे त्याचे पंथप्रेम तर असावेच पण वर त्याची अभिजात कलादृष्टीही असावी. एकनाथांनी आपल्या 'रुक्मिणीस्वयंवरा'त-

> तेथे कीर्तिनामा ब्राम्हण ।
> रायापाशी आला जाण ॥
> तेणे केले कृष्णकीर्तन ।
> तेथे तनमन वेधले ॥ १-१८

असे वर्णन केले आहे. कीर्तिनाना नावाचा ब्राम्हण आला व त्याने कृष्णाचे संकीर्तन केले असे म्हणण्यात फारसे नाट्य नाही. उलट, नरींद्राने जे आख्यान निवडले ते नाट्यपूर्ण व अद्भुतरम्य आहे. कल्याणकीर्ती भाट व किन्नर भीमकाच्या दरबारात प्रवेश करतात. रंभेशी संभोगसुख नाकारल्यामुळे वेदघोष नावाचा ऋषी शापभ्रष्ट झालेला असतो; तोच हा किन्नर. भीमकराजा भाटाला त्याच्या पर्यटनाचे वृत्त विचारतो. राजाला आपल्या कन्येसाठी योग्य वर हवा आहे, हे जाणून भाट किन्नराला देशोदेशीच्या राजाचे वर्णन करावयास लावतो. सर्व दिशांच्या राजांचे वर्णन किन्नर करतो. परंतु त्यापैकी एकाच्याही वर्णनाने रुक्मिणी प्रसन्न होत नाही. अखेरीस किन्नर कृष्णवर्णन करतो. तशी रुक्मिणी प्रफुल्लित होते व मोहून जाते.

या उपाख्यानामुळे किन्नर या एका पात्राची भर काव्यात पडली आहे. हा किन्नरही पक्षीरूप, पूर्वजन्मीचा ऋषी व रंभेचे सुख नाकारणारा असा असल्यामुळे कथावस्तूत अद्भुतरम्यता आली. त्याचबरोबर संवाद, वर्णन, प्रतिक्रिया इत्यादी अनेक घटकांचाही सहज

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

समावेश कवीला काव्यात करता आला. कल्याणकीर्ती भाट व किन्नर या उपाख्यानाने काव्याचे २२ 'खंड' व्यापले आहेत.

या सर्व काव्यखंडात २२५ हून अधिक ओव्या आहेत. गायनप्रकार व देशविदेश यांच्या वर्णनात कवीला आपली बहुश्रुतता दाखविण्यास चांगला वाव मिळाला आहे. देशोदेशीच्या राजांचे वर्णन करताना कवीने किन्नराच्या तोंडी सुमारे ७५ राजांची नावे घातली आहेत.[३१]

अशा जंत्रीमुळे काव्य नीरस होण्याची खूपच शक्यता असते. परंतु नरींद्राचे कौशल्य हे की इतक्या राजांचा नामनिर्देश करूनही काव्य कंटाळवाणे होऊ न देण्याची त्याने दक्षता घेतली आहे. राजांची केवळ नावे न सांगता त्यांची वैशिष्टचे काव्यमय पद्धतीने सांगून कवीने हे साधले आहे. उदाहरणार्थ-

जया वीराची खड्ग- विजू समरी:
ते गाजतिसे मेघ रूधिर धारी
वरिखति मोतियाचिया गारा थोरी:
कुंभस्थळिचिया २७०

दंडकी -दंमोळिती सांवनी:
नवसिये पुखी रण - जाखिणी
वैरियाचिया अंतोरियांचियावेणी:
वाय ताडन - वनांसी (इत्यादी) २७१

प्रस्तुत उपाख्यनाच्या निमित्ताने कवीच्या व्यक्तीदर्शन कौशल्यास विशेष वाव मिळाला.

यासी आळती सारदा न पुरे :
गाता गंधवति सीतरी स्वरे
कमळ - स्वतुरांची आइणि पुरे :
याचा गाईवा १५८

नारद - तुंवराचा सादी :
हे नाही गमक - स्वरांची मांदी
या गाता तरंगाचिया नदी :
चढेती ऐतारा पैं १५९

[३१] अतिक्षेतृ [२३८], अभीरकार्तिक [२८२], अश्वमेघीश्वर [२५३], ईशान्य [२३१], कर्ण [२४१], काशीराज [२४८], काळकोप [२६८], काळयवन [२२६], कीर्तिचंड [२४८], कीर्तीदेव [२२५] इत्यादी.

हा वोली ब्रह्मेया नुमाने :
याचा ठाइ आति शब्द - श्रृष्टीचे नाणे
ऐसे पाखिरू नाही सिहाणे :
पांजरा मू - गोळकाचा १६०

अशा गुणसंपन्न पाखराने विविध राजांचे व कृष्णाचे गुणवर्णन करण्यात विशेष औचित्य आहे.

श्रीकृष्ण व रुक्मिणी ही या महाकाव्यातील दोन महत्त्वाची पात्रे - नायक आणि नायिका. या दोघांचेही व्यक्तिदर्शन कवीने उत्कृष्ट बठविले वाहे.

ज्या किन्नराला पूर्वजन्मी प्रत्यक्ष रंभेचे आकर्षण वाटले नाही अशा निःसंगालादेखील श्रीकृष्णाचे सौंदर्य मोह घालते असे नरींद्राने दाखविले आहे. श्रीकृष्णाच्या बरवेपणापुढे ब्रम्हसुखदेखील ठेंगणे आहे. (३२०) त्याचे मुख चंद्रासारखे व डोळे कमळापेक्षाही सुरेख आहेत. त्याचे वक्षःस्थळ विशाल आणि बाहू आजानू आहेत. उदर, कंवर, मांड्या, पोटऱ्या हे सारेच अवयव प्रमाणबद्ध व आकर्षक आहेत. (३२२-३२३). श्रीकृष्णाचे सुंदर मुख पाहून चंद्र कलेकलेने खंगत जातो. (३२७) विवाहित स्त्रिया पतीशी समागम करताना आपण जणू श्रीकृष्णाशीच रत झालो आहोत असे मानतात (३३८) श्रीकृष्ण समुद्राच्या पोटी राज्य करतो. ब्रम्हदेवादिकांनाही त्याच्या भेटीची संधी लाभत नाही. (२९९) त्याने सगळे काळ गिळले आहेत आणि महाकाळाला बांधून ठेवले आहे. (३००) त्रैलोक्य हे जिचे घरकुल आहे अशा त्या मायेला देखील श्रीकृष्णाचे स्वरूप कळत नाही. (३०१) श्रीकृष्णाचा पराक्रम असा की त्यामुळे आकाश काळवंडले आणि सूर्याचे तेज वाढले. (३०३)

किन्नराने केलेल्या या कृष्णस्तुतीवरील रुक्मीची प्रतिक्रियाही पाहण्यासारखी आहे. हा वेदघोष ऋषी शापभ्रष्ट झाल्यापासून चळला आहे. त्याला भूताने पछाडले आहे. तो हवे ते बरळत असतो असे रुक्मीला वाटते. (३६९-३७२) सविस्तर नाही तरी रुक्मिणीचे रूपही किन्नराने रेखाटले आहे. स्त्रियांमध्ये लक्ष्मी रूपवती खरी; पण रुक्मिणी तिच्याहूनही सुंदर आहे; रतीहूनही ती चतुर-गुणवान आहे, इत्यादी (१९३).

श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांच्याशिवाय भीमक, रुक्मी, कल्याणकीर्ती, किन्नर, भावकळना, सुदेव इत्यादी कितीतरी पात्रे प्रस्तुत महाकाव्यात आली आहेत. आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रसंगपरत्वे त्यांचेही मनोगत कवीने कुशलतेने प्रगट केले आहे.

नरींद्राचे काव्य विविध अलंकारांनी नटलेले आहे. रूपक हा नरींद्राचा विशेष आवडता अलंकार असून इतरही अर्थालंकार त्याने प्राचुर्याने वापरले आहेत. या अर्थालंकारावरोबरच काव्यात श्लेष हा उभयालंकारही असावा असे वाटते. श्रीचक्रधर (१५, ३५, ३१८, ८२१, ८२४), चक्रपाणी (८७७), श्रीप्रभू (१९) पाणि-पात्र (५४८), गोसावी (६३९), यादव (४८२, ६३८) इत्यादी शब्दांवर श्लेष असावा; परंतु त्यासंबंधी काही निश्चयाने सांगणे कठीण आहे. काव्यलेखनापूर्वी नागदेवाचार्याकडून नरींद्रास घडलेले महानुभाव तत्त्वज्ञानाचे श्रवण व श्लशकुशल श्रीहर्षाच्या नैषधकाव्याचा संस्कार या दोन गोष्टी लक्षात घेता उपरिनिर्दिष्ट शब्दांवर कवीने श्लेष साधला असण्याची शक्यता मात्र विशेष आहे.

उत्तर कालीन संस्कृत महाकाव्यांमध्ये पांडित्याचा–पांडित्यप्रदर्शनाचा–अतिरेक झाला होता. नरींद्राने तो टाळला आहे.

परंतु योग्य त्या स्थळी आपली बहुश्रुतता त्याने अचूक प्रकट केली. किन्नर आणि त्याच्यामागे उभे असलेले त्याचे श्रुतिधर यांच्या गायनाच्या निमित्ताने नरींद्राने संगीतशास्त्रातील अनेक पारिभाषिक संज्ञा वापरल्या आहेत. (काव्यखंड २६ व २७) श्रीराग (१९०), देशांक (१९०) धानाश्री (२०८), मल्हार (२३५), रामग्रि, (२५५), गुजरि (२७३) आणि गौडी (२९०) या रागांचा निर्देश नरींद्राने केला आहे. यादवकालीन महाराष्ट्राला संगीताचे विशेष आकर्षण होते. 'संगीत चुडामणि' कार जगदेकमल्ल चालुक्य, 'संगीत सुवारक' कार राजा हरपाल, 'संगीत रामाकर' कार शार्ङगदेव, 'संगीत समयसारा' कार पार्श्वदेव हे सर्व संगीततज्ञ यादवकालीन होत. त्या काळात महाराष्ट्रात चौकाचौकात ऐश्वर्यशाली शामियाने उभारलेले असत आणि प्रजेसह राजेही तेथे संगीतास्वाद घेण्याकरता जात, असे इब्न बतूताने नमूद केले आहे. नगरांप्रमाणें ग्रामातही गीतशाळा असत व तेथेही संगीतकलेची आराधना चाले; आमणदेव यादवाला नृत्यसंगीताचे इतके वेड होते की आपल्या सैनिकपथकाला नृत्यगान पथकाचा पेहराव देऊन रामदेवरायाने त्याला सहज कैद केले.[३१].

नरींद्र ज्या रामदेवराव यादव राजाच्या दरबारी होता तो राजा, तत्कालीन प्रजा हे सारे असे संगीतप्रेमी असल्यामुळे तसेच संगीतविषयक ग्रंथांची निर्मिती तत्कालीन महाराष्ट्रात होत असल्यामुळे व त्यात प्रादेशिक शब्दांनाही परिभाषेचे रूप मिळत असल्यामुळे कवीने मोठ्या हौसेने अनेक संगीतविषयक संज्ञा वापरल्या आहेत. जसे अभंग, उपांग, गमक, गीत, ग्राम, छंद, जाती, ताल, ध्रुपद, ध्रुपदांग, प्रबंध, भाषांग, मूर्छना, राग' रागांग, रूपक, वर्ण वोडव, शुद्ध, श्रुती, श्रुतिकार, साळांग, सूड, स्वर इत्यादी.

यादवकालीन महाराष्ट्रात जशी संगीताची तशीच शिल्पकलेचीही उपासना होत होती. व ती वैशिष्टपूर्ण होती.[३२] म्हणूनच की काय नरींद्राने धारादामोदराच्या रचनावर्णनात (४१५–४४०) शिल्पशास्त्रातील पारिभाषिक व सामान्य संज्ञा वापरल्या आहेत. लाटांचे प्रतिशब्द (७१८), जलधरांची नावे (७१९), होड्यांची नावे (७२०), वृक्षवनस्पतींची नावे (७७८–८३९) व वेद, स्मृती, पुराणे आदींचे उल्लेख (१६–१७) या साऱ्या तपशिलावरून कवीची बहुश्रुतता व संस्कृत महाकाव्यातील पांडित्यदर्शनाचा संकेत उचित प्रमाणात पाळण्याची वृत्ती दिसून येते.

: ३ :

नरींद्रास 'महाकाव्य' हा वाङ्मयप्रकार हाताळण्याची इच्छा का झाली असेल असा प्रश्न मनात येतो.

नरींद्राची प्रतिभा महाकाव्यानुकूल होती हे एक कारण झाले. परंतु कवीचा काळही महाकाव्यलेखनास अनुकूल होता. तो यादवकाळात होता—राजकीय स्वातंत्र्य आणि भौतिक ऐश्वर्य यांचा उपभोग नागरिक घेत होते. मराठी ही राजभाषा होती. रामदेवरायासारखा सकलकलानिवासू राजा गादीवर होता. त्याच्या दरबारी कलावंतांची संभावना होत होती; बाहेरही विदग्धता आणि रसिकता यांना विशेष मान होता.

[३१] मु. ग. पानसे, १९६३, 'यादवकालीन महाराष्ट्र', पृ. क्र. १७०.

[३३] कित्ता, पृ. क्र. १७७.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धार्मिक क्षेत्रात चक्रधरस्वामींनी पुरोगामी धर्मविचार प्रसृत केला होता तर हेमाद्री – वोपदेव यांनी वैदिक संस्कृतीचे पुनरूज्जीवन सुरू केले होते.

ही सर्व परिस्थिती लिखित महाकाव्यप्रकाराच्या निर्मितीस अत्यंत अनुकूल होती. परंपरा स्वीकारावी पण तिला नवे रूप द्यावे, पौराणिक कथा घ्यावी पण तिला नवा अर्थ द्यावा, मायबोलीत लिहूनही विदग्ध रसिकांसाठी लेखन करावे – अशी प्रेरणा प्रतिभावंत कवींना व्हावी अशीच यादवकालीन सामाजिक परिस्थिती होती. शल्य आणि नृसिह यांनी अनुक्रमे 'रामायण' व 'नलोपाख्यान' ही काव्ये लिहिली तीही याच प्रेरणेची निदर्शक म्हणावी लागतील. ही दोनही काव्ये उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या वाङमयरूपांसंबंधी आज नेमके काही सांगता येत नाही. परंतु त्यांच्या नावावरून ती अनुक्रमे मौखिक महाकाव्यनिष्ठ व लिखित महाकाव्यनिष्ठ काव्ये होत हे स्पष्ट आहे. या उभय काव्यांच्या सापेक्षतेने, एका ईर्ष्येने नरींद्राने 'रुक्मिणी – स्वयंवर' हे महाकाव्य लिहिले आहे हे लक्षात घेतले म्हणजे रामायण, नलोपाख्यान ही दोनही महाकाव्ये 'रुक्मिणी-स्वयंवरा-प्रमाणेच अभिजात पद्धतीची महाकाव्ये असावीत असे वाटू लागते.

१२ व्या व १३ व्या शतकांत संस्कृत व प्राकृत या भाषांमध्ये विपुल महाकाव्यनिर्मिती झाली हेही येथे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यामुळेही नरींद्रास महाकाव्यप्रकाराचे अगत्य वाटले असेल.

अनुकूल प्रतिभा, अनुकूल सामाजिक परिस्थिती व अनुकूल वाङ्मयीन परिस्थिती यातून 'रुक्मिणी— स्वयंवर' या मराठीतील आद्य व श्रेष्ठ महाकाव्याची निर्मिती झाली आहे.

अर्थात परिस्थिती अनुकूल आहे असे पाहून एखाद्या कवीस संस्कृतातील उत्तरकालीन लिखित महाकाव्यांच्या धर्तीवर सर्गबद्ध, वृत्तबद्ध, चित्रबंधात्मक, पांडित्यावडंबरप्रधान कृत्रिम असे व्याख्यागम्य महाकाव्य लिहिता आले असते; किंवा महानुभव पंथाच्या तत्त्वविचाराने भारावून जाऊन पाली, महाराष्ट्री, अपभ्रंश या भाषांतील महाकाव्यांप्रमाणे महाकाव्य-संकेतांकडे पूर्ण दुर्लक्ष करणारे धर्मप्रसारक महाकाव्यही लिहिता आले असते. परंतु नरींद्राच्या अस्सल प्रतिभेने त्यास असे प्रवाहपतित होऊ दिले नाही. पौराणिक विषय, धीरोदात्त नायक, नगर, ऋतू, उपवन, जलक्रीडा, प्रयाण, सूर्यास्त, चंद्रोदय, विरह इत्यादी घटकांची सविस्तर वर्णने, नमन, अभिजात कल्पनाविलास, अलंकारसंपन्नता व काव्यात्म, अग्राम्य भाषा इत्यादी काव्याचे अंतरंग संपन्न करणारे संस्कृतातील महाकाव्य-संकेत कवीने राजीखुषीने स्वीकारले. परंतु सर्गबद्धता, वृत्तात्मकता, चित्रबंध, पांडित्यातिरेक, शास्त्रविवेचन-परता इत्यादी वरवरचे किंवा रसहानिकारक संकेत मात्र त्याने स्पष्टपणे नाकारले. त्याऐवजी त्याने प्रकरणसूचक पण सलग, ओवीछदात्मक महाकाव्य रचले. याबाबतीत त्याने प्राकृत कवींचा आदर्श नजरेपुढे ठेवला. परंतु अनेक प्राकृत महाकाव्यातील अतिरिक्त प्रमाणातील महाकाव्यसंकेतांची उपेक्षा व धर्मप्रसारहेतूचा अतिरेक ही वैगुण्ये मात्र त्याने कटाक्षाने टाळली. कुठल्याही संस्कृत – प्राकृत पूर्वसूरीने ज्या विषयावर महाकाव्य लिहिले नव्हते असा विषय नरींद्राने निवडला— रुक्मिणी – स्वयंवर. तो निवडण्यामागे प्राकृत महाकवीं-प्रमाणे पंथनिष्ठाही प्रगट केली. परंतु जीवात्मा-परमात्मा, त्यांच्यातील द्वैत, परमेश्वरप्राप्तीसाठी जीवात्म्याला आवश्यक असलेली विरहवेदना, कनवाळू परमात्मा, बद्धमुक्त जीवात्म्याच्या उद्धरणासाठी त्याचे तडीने धावून जाणे उभयतांच्या मीलनामधील अनेक शत्रूंचा त्याने निःपात करणे इत्यादी तत्त्वज्ञान ज्ञात असूनही त्यासाठी कृष्ण – रुक्मिणीकथा त्याने राबवून घेतली नाही. 'प्रेमगर्भ श्रोत्यांसच' कळेल अशी या तत्त्वज्ञानाची झिलई त्याने कृष्ण-रुक्मिणी कथेला देऊन ठेवली. त्यामुळे पंथप्रचाराचा किंवा रूपकाचा जाच महाकाव्यास झाला नाही. पण लिखित महाकाव्यास जरूर असलेली प्रतीकात्मकता, प्राचीन कक्षेस नवा, वर्तमानसापेक्ष अन्वय देणे हा गुण मात्र त्याच्या महाकाव्यास सहजा-सहजी प्राप्त झाला.

ज्याप्रमाणे रुक्मिणी-स्वयंवराची कथा संस्कृत-प्राकृत महाकाव्यांस अपरिचित आहे त्याप्रमाणे नरींद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'त असलेला [मधुरा] भक्तिरसही प्राचीन संस्कृत-प्राकृत महाकाव्यांना अज्ञात आहे. म्हणजे नरींद्राने केवळ नवा विषयच निवडला नाही, त्याला नवा अर्थच दिला नाही तर त्याबरोबर नवा रसही आपल्या महाकाव्यात खेळविला.

'शृंगारवीर शांतानामेकोअंगी रस इष्यते,
अंगानि सर्वेऽपि रसाः

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे विश्वनाथाने [साहित्यदर्पण, ६–३१७] म्हटले आहे. म्हणजे महाकाव्यात शृंगार, वीर किंवा शांत यांपैकी एक रस अंगभूत असतो आणि इतर रस गौण असतात. संस्कृतातील अधिकांश महाकाव्ये शृंगाररस-प्रधान व प्राकृतातील अधिकांश महाकाव्ये शांतरस-प्रधान असून क्वचित काही संस्कृत–प्राकृत महाकाव्ये वीररसप्रधान आहेत. शृंगार–वीर–शांतरसप्रधानतेचा संस्कृत–प्राकृत संकेत नरेंद्राने नाकारला आहे. संस्कृतातील अधिकांश लिखित महाकाव्यलेखक दरबारातील विलासी वातावरणात वावरणारे व तशाच विलासी रसिकांसाठी लेखन करणारे कवी होते; म्हणून त्यांच्या काव्यात शृंगाररसप्राधान्य आले असावे. प्राकृतातील अधिकांश कवी बौद्ध किंवा जैन मतानुयायी साधक होते. स्वपंथीयांच्या आध्यात्मिक उद्धारासाठी ते महाकाव्य लिहीत होते; बौद्ध-जैन या पंथांच्या तत्त्वज्ञानाला शांतरस अनुकूल होता; म्हणून प्राकृत महाकवींनी आपल्या महाकाव्यात शांतरस खेळविला असावा. परंतु महानुभाव पंथ केवळ वैराग्याचा पुरस्कार करीत नव्हता; वैराग्याच्या जोडीला ईश्वरविषयक रती–भक्ती– या तत्त्वाचा उपदेशही सदर पंथाने केला. या पंथाच्या अभिनव आणि मौलिक विचारसरणीने महाकवी नरेंद्र प्रभावित झाला होता. म्हणूनच त्याने महाकाव्यप्रकारात नवीन असा मधुरा भक्तिरस आपल्या 'रुक्मिणी–स्वयंवरा'त आविष्कृत केला.

म्हणूनच 'भक्तिरसप्रधानता' हे मराठी महाकाव्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय असे म्हणावयाचे.

नरेंद्राचे इतके रमणीय व महाकाव्यप्रकारदृष्ट्या इतके ऐतिहासिक महत्त्व असलेले महाकाव्य अपूर्ण स्वरूपात उपलब्ध असावे व नीरस, पाल्हाळिक आणि पुनरुक्तीने दूषित अशा ओव्यांची [34] त्यास केशव तळेग्रामकराने वा अन्य कोणा सामान्य कवीने पुरवणी जोडावी हे मराठी सारस्वताचे दुर्भाग्य होय. [35]

---

३४. ह. ना. नेने, १९५७, संशोधनलेखसंग्रह. भाग पहिला, 'नरेंद्रकवीच्या रुक्मिणी स्वयंवरावर अधिक प्रकाश' पृ. क्र. ८२–१०५.

३५. वि. भि. कोलते, १९४०, नरेंद्र–कवि–कृत रुक्मिणी–स्वयंवर [प्रस्तावना] पृ. क्र. १३.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आज अचानक गाठ पडे

कवि – अनिल

संगीतकार – गायक : डॉ. कुमार गंधर्व

रसग्रहण : वामन इंगळे

श्रेष्ठ कवितेत एक आंतरिक लय असते. तिच्या-मुळेच ती कविता श्रेष्ठ कविता आहे असे आपल्याला म्हणता येते. कलाकृतीच्या आरंभापासून तो समाप्ती-पर्यंतच्या काळात त्या लयतत्वाचा एका जीवशास्त्रीय पद्धतीने विकास झाला आहे असे दाखवून देता येऊ शकते. तिचे स्वरूप काहीसे वस्तुनिष्ठ तर काहीसे अमूर्त असते. (मानवी जाणीवेचे आपण कसे रूप करतो यावर ते अवलंबून राहील.) त्या लयीची कवितेतील खूण म्हणजे कवितेची पूर्ण बंदीश. (प्रा. गो. वि. करंदीकर संगीतशास्त्रातील बंदीश (किंवा बंदिश) ही अन्वर्थक संज्ञा कवितेच्या समीक्षेतही वापरतात. मला वाटते ही संज्ञा आशय आणि त्याने शोधलेल्या स्वतःच्या रूपाचा एकसमयावच्छेदेकरून निर्देश करून टाकते. कुमारांच्या गायकीविषयी लिहिताना या संज्ञेचा विशेष उपयोग होण्यासारखा आहे.)

कवितेत यमक, छंद यामुळे देखील एका दुसऱ्या लयीचा भास निर्माण होत असतो. आंतरिक लय प्रत्यक्ष कालाला (Time) साक्षात करण्याचे कार्य करीत असते. हा दुसरा लयाभास कवितेचा दर्शनी भाग सजवीत असतो. (खरे म्हणजे आंतरिक लय असण्यावरच कविता-बंदिशीची चैतन्यपूर्णता अवलंबून आहे.)

'आज अचानक गाठ पडे'—अनिलांच्या या कवितेत आंतरिक लयीची अंगभूत आवर्तने आहेत. त्यांच्या समाजजीवनविषयक कवितांविषयी निरपवादपणे असे म्हणता आले नाही तरी प्रेमकवितांच्या बाबतीत हा निरपवादपणा दाखवून देता येण्यासारखा आहे. एकाच कवीच्या दोन वेगळ्या भाववृत्ती व्यक्त होतांना असा असा फरक का पडावा ? यासंबंधी काही विश्लेषण देता येऊनही शेवटी असे म्हणावे लागेल की कविता अथवा पूर्ण निर्मिती म्हणजेच एक मट्टी असते. ती जमली तर 'शून्यामधी वसाहती' निर्माण होतील; न जमली तर शब्द आणि शून्य यात फरक रहात नाही. 'आज अचानक गाठ पडे' ही निर्मिती म्हणजे अस धारण अशी जमून गेलेली एक मट्टी आहे. कवितेचा प्रारंभ असा—

> १. आज अचानक गाठ पडे
> भलत्या वेळी भलत्या वेळी
> असता मन भलतीचकडे
> आज अचानक गाठ पडे

तिसऱ्या चरणात आलेला 'भलतीचकडे' दुसऱ्या चरणात आलेल्या दोन 'भलत्यांशी ओळख ठेऊन असला तरी आकस्मिकपणाला एक गहिरेपण देऊन जातो. या कवितेतील अल्पाक्षरत्व लक्षणीय आहे. भाष्यानुवादात मूळ अर्थाला बटबटीतपणा येईल इतकी तिची बंदिश 'चुस्त' आहे.

> २. नयन वळविता सहज कुठेतरी
> एकाएकी तूच पुढे
> आज अचानक गाठ पडे.

> ३. दचकुनी जागत जीव निजेतच
> क्षणभर अंतरपट उघडे
> आज अचानक गाठ पडे.

> ४. नसता मनिमानसी अशी ही
> अवचित दृष्टिस दृष्टि भिडे
> आज अचानक गाठ पडे.

कडवे नं. २ पर्यंत तीरासारखा आलेला अनुभव तिसऱ्या कडव्यात एका Flash Back चा आधार घेताना दिसतो. अगदी समोर घडत असलेला काळ हा किंचितसा भूतकाळात ओढला जातो. तेवढ्यापुरता तो

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

अनुभव पसरट झाल्यासारखा होतो. पण पुन्हा चौथ्या कडव्यात तो गति पकडतो. 'नसता मनिमानसी अशी ही अवचित' यातील पुनरुक्ति आणि स्पष्टीकरण देखील 'दृष्टिस दृष्टि पुढे' या अनुभवाच्या जिवंतपणात (फारसा अवरोध न करता) वितळून जातात.

> ५. गूढ खूण तरि कळुन नाकळुन
> मांबावून मागे मुरडे
> आज अचानक गाठ पडे.

ती दृष्टि भांबाऊन मागे मुरडते. इथे तो अनुभव पुन्हा गतिशील होतो. गूढ तव... मध्ये गूढ हा शब्द येतो. पण कविता गूढ होत नाही. ती एका पार्थिव पातळीवरच कायम राहते.

> ६. निसटुन जाई संधीचा क्षण
> सदा असा संकोच नडे
> आज अचानक गाठ पडे.

आलेली संधी निघून जाते. हा संकोची स्वभाव असाच नेहमी अडथळा आणतो. इथे हतबुद्धपणाचा एक ताण निर्माण होतो. आणि तरीही रसिकाला त्या त्या ताणाला अगदी लगटून बसलेली काव्यात्म विश्रब्धताही लाभते. मधल्या Flash Back चा गति अवरुद्ध करणारा किंचित् अडथळा सोडला तर अनिलांची ही बंदिश काव्यात्म परिणामाच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे यात काही संशय नाही.

आणि म्हणूनच डॉ. कुमार गंधर्वांसारख्या प्रज्ञावंत गायक आणि शास्त्रकाराला ही बंदिश कंठबद्ध करण्याचा मोह झाला असावा. संगीताची बंदिश आणि कवितेची बंदिश यात काही महत्त्वाचे भेद संभवले तरीही अनिलांच्या या कवितेत एक गायनयोग्य बंदिश होण्याचीही सर्व सामग्री आहे. तिच्या साहित्यिक किंवा सांगीतिक, कुठल्याही आवाहनातून कुमारांनी ही कविता गायिली असेल. पण झाली ही गोष्ट 'एका लाखाची झाली' अशी दाद साहित्याच्या वा संगीताच्या रसिकांना द्यावी लागणार आहे.

आज महाराष्ट्रात भावगीत गायनाच्या दोन पद्धती दिसून येतात. गायकाने केरव्याच्या (वा अलिकडे रूपकाच्या) ठेक्यात भावपूर्णतेने भावगीताची एकेक ओळ म्हणावी. प्रत्यक्ष गीत सुरु होण्यापूर्वी थोडीशी Interlude व्हावी आणि ओळ पूर्ण झाल्यानंतर विविध वाद्यकारांनी पार्श्वसंगीत द्यावे. पहिला प्रकार हा असा काहीसा आहे. लता, आशा, सुधीर फडके, स्नेहल भाटकर, माणिक वर्मा, वाटवे आदि गायकगायिकांनी तो महाराष्ट्रात विशेष लोकप्रिय केला.

गायकी अंगाने भावगीत गाणे हा दुसरा प्रकार. हा प्रकार नाट्यगीतगायनापेक्षा मूलभूतपणे वेगळा नाही. जी. एन. जोशी, छोटा गंधर्व, जे. एल. रानडे, सुशीला टेंबे ई. गायकगायिकांनी हा प्रकार हाताळला आहे. कुमारांनी गायिलेले प्रस्तुत भावगीत हे दुसऱ्या प्रकाराला अधिक जवळचे आहे. परंतु कुमारांची गायकी ही परंपरेपेक्षा भिन्न असल्यामुळे या भावगीतालाही त्यांनी काही नवीन पद्धतीने हाताळले (Treatment) आहे. साधारणतः भावगीत गायकी अंगाने गाणारा गायक स्थायी सिध्यासाध्या पद्धतीने गातो. अंतऱ्याची पूर्ण ओळ गाऊन झाल्यावर सोयीच्या जागेवर तारपड्ज्, आणि नंतर आकार लाऊन प्रथम एकपट आणि नंतर दुप्पट अशा पद्धतीने तनाईत करतो. पुन्हा स्थायी. अंतऱ्यात पुन्हा तारषड्ज् व आकार. गायकपरत्वे तपशीलाचा फरक होईल. पण बहुतेकांची पद्धती मूलभूतपणे अशी. कुमार ही रूढ पद्धती स्वीकारीत नाहीत. कुमार स्थायी म्हणून झाल्यावर लगेच एक हलकासा एकार लाऊन घड्याळीच्या स्प्रिंगसारख्या (खरे म्हणजे तारांच्या गुंतवळी Coils सारख्या) अतिशय बारीक आणि भुरक्या अंगाच्या ताना घेतात. 'भलत्या वेळी' मधील 'भ' वर ते एक उस्तादी ढंगाचा भकार भरतात. म्हणजे इथे गायकीचा क्रमवार विस्तार नाही. तर इथे बुद्ध्या निर्माण केलेला एक disorder आहे. जो अर्थपूर्ण असल्याचा अनुभव येतो. पुन्हा 'आज मी रुसून आहे' या दुसऱ्या भावगीतात हाच क्रम पुनरावृत्त झालेला नाही हे विशेष. 'नयन वळविता' झाल्यावर एक अतिशय अर्थपूर्ण आणि विश्रब्धशील थांबा (Pause) आहे. पण ही विश्रब्धता पुढे येणाऱ्या लहानशा वादळाची पूर्वसूचना असते. 'एका····एकी··' च्या वजनदार उच्चारणाने ते वादळ साकार होते. आणि पुन्हा स्थायीला आल्यानंतर विश्रब्धता येते. कुमारांच्या गायकीत उत्कंठा आणि विसर्जनाचा जो एक वेगळा प्रकार वामनराव देशपांड्यांना जाणवला तसेच पण भिन्न तपशील असलेले उत्कंठा विसर्जन इथेही लाभलेले आहेत.

कुमार या बंदिशीला मध्यलय त्रितालात आळवितात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्थायी, समुद्राचा संथपणा विशालपणा घेऊन येते. तर कुमारांच्या गळ्यातील विलक्षण हरकती त्याला समुद्रांतर्गत खळबळीची संवेदना देऊन जातात. संगीत-समीक्षकांत कदाचित कुमारांनी कायम केलेल्या समेविषयी वाद होऊ शकतील. एरव्ही 'गाठ पडे' वर सम येऊन जायला हरकत नव्हती. परंतु कुमार विनदिक्कतपणे 'अचानक' वर झोकदारपणे समेचा आघात करतात. कुमारांनी असे का केले असावे ?

मूळ बंदीशीच्या काठाकाठाने याचा काही शोध घेता येईल काय ? संपूर्ण कवितेत 'अचानक' गाठ पडली या अनुभवाला एक मध्यवर्ती महत्व आहे. फक्त 'गाठ' पडली असती—अथवा पूर्वनियोजनाने भेट झाली असती तर ही सारी आकस्मिकपणातून आलेली हुरहुर निर्माणच झाली नसती. दुसऱ्या काही प्रतिक्रिया निर्माण झाल्या असत्याही. पण त्या वेळी कविताच दुसऱ्या दिशेने प्रवाहित झाली असती. (म्हणजे कविता दुसरीच झाली असती.) पण ही कविताच त्या अचानकतेच्या तारांनी झणकारून निघाली आहे. म्हणजे खुद्द अनिलांच्या मनातही या 'अचानक' वरच समेचा केंद्रबिंदु कायम झाला असला पाहिजे. आणि नेमका अचानकतेचा तोच क्षण कुमारांनी ताल अंगाने समवद्ध केला आहे. यात अडचण एवढीच की माझ्यासारखे 'स्नानगृह' गायक जेव्हा 'अचानक' वर सम घेऊन गायनाचा प्रारंभ करतील तेव्हा ते दुसऱ्या आवर्तनात (काहीतरी घालमेल होऊन) 'गाठ' वरील समेवर येऊन पडतील. म्हणजे कुमारांचे गायन एरव्ही ज्या चांगल्या कारणासाठी 'बिकट' आणि अननुकरणीय बनते तिथे पुन्हा सर्वसाधारणांसाठी या एका नव्याच अडचणीची भर पडताना दिसते. कुमारांचे हे यशही अद्वितीय आणि अगदी स्वत:सारखे आहे (Unique) यात मला तरी संशय वाटत नाही. कुमारांच्या मराठी उच्चारणाविषयी काही मतभेद आहेत. या गीताच्या संदर्भातही ते होऊ शकणार नाहीत असे नाही. उदा. एकाएकी हा शब्द येकायेकी असा उच्चारल्याचा भास होणे, (किंवा या रेकॉर्डच्या पाठीमागे 'खुलता'चा खुल्ता असा उच्चाराभास) अथवा गायकी ढंगात 'एकाएकी' या शब्दाचा 'एका···· एकी ····' असा पदविग्रह होणे···· आदि स्थाने मतभेदाला कारणीभूत होऊ शकतील. गायनात उच्चारण हे 'बानी' प्रमाणे होत असते अशीही एक ऐतिहासिक धारणा आहे. परंतु राजाभैया पूछवाले या पूर्व 'बानी' संबंधात मत व्यक्त करतात ते असे.

'अकबर बादशहाके समय ध्रुपद गायनकी चार शैलिया थी । उन्हे वाणी कहते थे । उनके नाम खंडारी, नोहारी, डागुरी और गोरहारी थे । तानसेन गोड ब्राम्हण होने के कारण उसके ध्रुपद गायकीको गोडारी (गौरहारी) वाणी कहते थे । तानसेन का जवाई प्रसिद्ध वीनकार राजा समोखनसिंहके ध्रुपद गायकीको खंडारीवाणी कहते थे । बृजचंद यह डागुर ग्रामका रहनेवाला होनेसे उसके ध्रुपद गायकीको डागुरी वाणी कहते थे । श्रीचंद यह नोहार ग्रामका रहनेवाला होनेसे उसके गायकीको नौहारी वाणी कहते थे ।

'इन चार प्रकारकी वाणीयोमे क्या रहस्य है यह गाकर बतलानेवाला कोई भी गायक मुझे नही दिखायी दिया । आजकाल जो ध्रुपद गायनपद्धती प्रचलित है वह चार वाणीयोंका मिश्रण है यह समझमे नही आता । वाणी के प्रकार यह अब केवल ऐतिहासिक विषय ही रह गया है ।'

म्हणजे उच्चारणाला काही शास्त्रीय आधार आहे या रूढ समजुतीला राजाभैय्या पूछवाले यांचा हा उतारा असा छेद देऊन जातो. निदान काहीच निश्चयात्मकपणे सांगता येणे अशक्य आहे असे सुचवून जातो. अशा पार्श्वभूमीवर ज्या कुमारांच्या गायकीसंबंधात प्रत्यक्ष घराण्यांची कल्पनाही केवळ ऐतिहासिक होऊ शकेल. त्यांच्या गायनशैलीतील मर्म या पूर्व वाण्यांच्या आधाराने उकलून दाखविणे अशक्य आहे. (आणि स्वत: कुमार देखिल आपण एखाद्या पूर्व वाणीला अनुसरून गातो असे मानताना दिसत नाहीत.)

त्यांनी स्वत:च रचलेल्या माळव मारवाडी हिंदी आदि भाषा-बोलीतील चिजांचे उच्चारण ऐकल्यावर आपल्याला एक कळते—ते हे की त्यांच्या उच्चारात लयपूर्णतेच्या जोडीला न्यास, गोलाकार शब्दधाटणी आणि एक धीट घवघवीत अशी चैतन्यपूर्णता आहे. प्रस्तुत भावगीतातील (अथवा बालगंधर्वांची पदे गाताना) त्यांच्या उच्चारणात जो एक इषद् स्पर्शाचा अमराठीपणा आहे त्यांत स्वत: कुमारांचा काही दोष आहे अथवा तेवढ्यामुळे बंदीशीचे सांगीतिक मूल्य जरामरही कमी होते असे म्हणता येणार नाही. कुमारांचे पूर्ण नांव शिवपुत्र सिद्रामाप्पा कोमकाळी असे

[पान २४३ वर]

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एका श्रेष्ठ उर्दु साहित्यिकाच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त संक्षिप्त परिचय

उर्दू साहित्यातील जादूगार –

कृष्णचंद्र

मुकुंद जागीरदार

उर्दू आणि हिंदी भाषा व साहित्यक्षेत्रातील कृष्णचंद्र हे अनभिषिक्त कथासम्राट आहेत. त्यांच्या अनेक कथा व इतर साहित्य भारतातील विविध भाषांतच नव्हे तर इंग्रजी, रशियन, फ्रेंच, चिनी, सिंहली, जर्मन आदि एकूण ६५ भाषांमधून अनुवादित झाले आहेत, होत आहेत. यावरून त्यांच्या तेजस्वी व सर्वसंचारी लेखणीची किमया केवढी प्रबल आहे, हे स्पष्ट होते.

कृष्णचंद्रांच्या कथा रंजनात्मक तर असतातच पण शिवाय समाजजीवनातील विविध प्रवाहांचाही मागोवा घेऊन, त्या ज्ञानबोध देण्याला समर्थ ठरतात. त्यांची लेखणी एकदा कागदावर अवतरू लागली म्हणजे तिचा सुंदर, कल्पनारम्य पदन्यास थयथय करीत मन काबीज करीत जातो आणि मती कुंठित होते. तिला थांबण्याची, विश्रांती घेण्याची जरूरीच भासत नाही. कृष्णचंद्रांच्या कथा वाचतांना असे अनेक वेधक प्रसंग येतात की, ते हृदयाला केवळ फुलवितच नाहीत तर वाचकांना गंभीरपणे विचार करायला प्रवृत्त करतात. त्यांच्या कथात कधी मद नि मस्तीचा जल्लोष असतो तर कधी अत्तराच्या मादक शिडकाव्याने त्या वाचकांना मारून टाकतात.

उपहासगर्भ विनोदी लेखन हे कृष्णचंद्रांच्या लेखणीचे एक वैशिष्टय. उपहास हे तर त्यांचे एक प्रभावी अस्त्र आहे. वस्तुतः अशा अस्त्राचा वापर करतांना मोठा विचार करावा लागतो. अन्यथा तारेवर कसरत करू पाहणाऱ्या व्यक्तीची तोल जाऊन तोंडघशी पडण्याची जशी शक्यता असते, तद्वतच लेखकाला अपयश व कमीपणा येण्याची फार शक्यता असते. पण कृष्णचंद्र अशा कसरतीच्या लेखनात कुशल आहेत.

कृष्णचंद्रांचे पुस्तक एकदा हाती पडले म्हणजे वाचक ते पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. कृष्णचंद्रांचे साहित्य मला फार उशिरा वाचायला मिळाले. १९६३ साली मी त्यांचा "सपनों का कैदी" हा कथासंग्रह प्रथम वाचला. त्यातील पहिली कथा मी वाचायला घेतली. पण एकाच बैठकीत पूर्ण पुस्तक वाचल्याशिवाय मी उसंत घेऊ शकलो नाही. इतकी ओढ, इतका चटका त्या पुस्तकातील कथांनी मला लावला. त्यातील प्रत्येक कथा विविधतेने नटलेली व खोचक अन् बोचक विनोदाने फुललेली होती. त्यांच्या लिखाणाचा प्रभाव माझ्यावर इतका पडला की मी लगेच त्यांच्या दोन कथांचा अनुवाद करून मराठी रसिकांना सादर केला. आणि तेव्हापासून आतापावेतो मी त्यांची सुमारे तीस पुस्तके वाचली. कथासंग्रहावरोबरच कादंबऱ्या, एकांकी, विनोदी लेख आदींचा त्यात समावेश आहे. हे सर्वच साहित्य कृष्णचंद्रांनी आपल्या असामान्य शैलीने आविष्कृत केले आहे.

कृष्णचंद्रांना विषयाची मुळीच वाण नाही. सरकारी हॉस्पिटलमध्ये साफसफाईचे काम करणारा 'कालू भंगी' भेळ विकणारा मुका 'चन्दरू' यांच्या जीवनापासून तो कैदी, इंजिनिअर, डॉक्टर, एवढेच नव्हे तर वेश्या, नावाडे, स्वातंत्र्यसैनिक, मंत्री, सिनेमानट निर्माते, दिग्दर्शक, मंगळावरील लोक ह्यांच्यापावेतो अनेक प्रकारच्या जीवनातील विविध पैलूंवर उत्कृष्ट अशा हृदयंगम व तरल भावस्पर्शी कथा त्यांनी निर्माण केल्या आहेत. इतक्या विविध पैलूंवर व घटनांवर मोठ्या कौशल्याने कथालेखन करणारा कथाकार क्वचितच आढळेल.

कृष्णचंद्र हे प्रगतिशील लेखक असून आपल्या लेखनातून सुंदर, शांत आणि समृद्ध जीवन प्रतीत करण्याची प्रेरणादेण्याचे धवल कार्य ते करीत असतात. त्यामुळे समाजाला रंजनाबरोबर सहजतेने मार्गदर्शनही

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लाभते. प्रेम आणि सौंदर्यपूर्ण भावकथा चित्रित करण्यात ते धाकबगार आहेत. परंतु तसे करीत असतानाही व्यक्तिमात्रावर कसे अत्याचार होतात आणि त्यांचे जीवन कसे भयावह असते याचाही ते प्रकर्षाने परामर्श घेत असतात. त्यांच्या काही कथा रूपकात्मक स्वरूपाच्या, तर काही कथा प्रत्ययकारी असतात. याचा उत्कृष्ट नमुना म्हणून त्यांच्या 'संतान का इस्तिफ़ा' 'जूता', 'जामून का पेड़', 'व्हेक्सीनेटर', 'मोहनजोदाडो का खजाना', 'अन्नदाता', 'दिल के टुकडे' या कथांचा उल्लेख करता येईल.

कृष्णचंद्रांचा जन्म २६ नोव्हेंबर १९१४ रोजी काश्मिरात झाला. पण त्यांचे शिक्षण मात्र लाहोर येथे झाले. तथापि, त्यांच्यावर काश्मिरमधील जीवनाची बरीच छाप बसली. त्यांमुळे त्यांच्या अनेक कथातून काश्मीरमधील निसर्गसौंदर्याचे, तेथील लोकजीवनाचे बहारदार वर्णन वाचावयास मिळते. तेथील दऱ्याखोऱ्यांचे अन् नद्यानिर्झरांचे, वृक्षवल्लींचे वर्णन वाचताना तर वाचक अगदी तल्लीन होऊन जातो.

काश्मीरच्या सौंदर्याबरोबरच त्यांनी भारतातील गल्लीबोळापासून तो शेते, जंगल, वेरूळ-अजिंठा, नैनीताल, दिल्ली, मुंबई पर्यंत अनेक स्थळांचाही उपयोग आपल्या कथांतून केला असून व्यक्त-अव्यक्त अशा वलयांची दीप्ती निर्माण केली आहे.

आतापावेतो त्यांचे अनेक कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यातल्या त्यात अन्नदाता, पूरे चाँद की रात, काश्मीर की कहानियाँ, गर्जन की एक शाम, सपनों का कैदी, कबूतर के खत, फुलदान आणि आधे घण्टे का खुदा अशा उत्कृष्ट व भरदार कथासंग्रहांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. तद्वतच त्यांचा 'कांच के टुकडे' हा कथासंग्रह तर वृत्तपत्रांतील कुतूहलपूर्ण व चटकदार बातम्यांचा एक सुगंधित फुलोरा म्हणून दर्शविता येईल. याशिवाय त्यांची 'जामुन का पेड़', 'कबूतर के खत' 'नाग और शबनम' ही विनोदी कथासंग्रहांची पुस्तके उल्लेखनीय आहेत. त्यांची 'एक गधे की आत्मकथा', 'एक गधे की वापसी', 'गधा नेफा में', ही पुस्तकें तर इतकी गाजली की त्यावर मुंबईचे श्री. रंगनाथ कुळकर्णी यांनी 'एका गाढवाची कहाणी' या नावाचा एकपात्री प्रयोग बसविला व त्याचे महाराष्ट्रात १०० च्या वर निरनिराळ्या शहरात प्रयोग सादर करून ते लोकप्रिय केले.

कृष्णचंद्रांना 'दो फर्लांग लम्बी सडक' या सुरुवातीच्या कथेमुळे चांगली प्रसिद्धी मिळाली. त्यावेळी ते लाहोर येथे कॉलेजात शिकत होते. सुप्रसिद्ध सिनेनट श्री. बलराज साहानी त्यावेळी कथालेखन करीत असत व त्यांचे नावही कथालेखक म्हणून सर्वत्र झाले होते. त्यांच्याच कथांमुळे कृष्णचंद्रांना कथालेखक बनण्याची प्रेरणा झाली.

'दो फर्लांग लम्बी सड़क' च्या यशामुळे त्यांना नवा उत्साह आला. नंतर ते सतत लिहू लागले. १९४० मध्ये त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी त्यांच्या लेखणीतून अनेक उत्कृष्ट कथा उतरल्या. बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळावर त्यांनी लिहिलेली 'अन्नदाता' ही प्रदीर्घ कथा तर फारच गाजली. त्याचप्रमाणें त्यांच्या 'आधे घण्टे का खुदा' याही कथेचा एक गतिमान कथा म्हणून उल्लेख केला पाहिजे. या दोन्ही कथांमध्ये कृष्णचंद्रांची झेप किती मोठी आहे याचे प्रत्यंतर येते.

भारत-पाक फाळणीच्या वेळी देशात जे अमानुष अत्याचार झाले त्यावर उर्दूतील सादत हसन मंटो, ख्वाजा अहमद अब्बास, राजेंद्रसिंह बेदी या लेखकांनी प्रखर प्रकाशझोत टाकला आहे. रामानंद सागर तर त्या अत्याचारामुळे फार उदास बनले होते. त्यांनी 'और इन्सान मर गया' हे हृदयस्पर्शी पुस्तक लिहिले. पण या विषयावर सर्वात अधिक जळजळीत लेखन जर कुणी केले असेल तर ते कृष्णचंद्रांनीच. ते त्यांचे लिखाण अत्यंत भावसूचक व ज्वलंत आहे. 'गद्दार' ही कादंबरी देखील त्यांनी फाळणीवरच निर्माण केली असून आपण कुठे उभे आहोत अन् कुठे काय जळत असून आपली कशी भयानक अवस्था निर्माण झाली आहे याचे यथार्थ दर्शन घडविले आहे.

त्यांनी आतापावेतो पंधराहून अधिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'गद्दार', 'रेत का महल' (समाजातील दोषांचे उपरोधपूर्ण चित्रण), हाँगकाँग की हसीना आणि धनगांव की रानी (उत्कृष्ट रहस्यमय कादंबरी), लन्दन के सात रंग, मेरी यादों के चिनार ह्या त्यांच्या कादंबऱ्या उत्कृष्ट आहेत. ह्याशिवाय गंगा बहे न रात, प्यासी धरती प्यासे लोग, पराजय, पाच लोफर, बावन पत्ते, मेरा जंगल मेरी बस्ती, आदी कादंबऱ्या पण एका वेगळ्या वैशिष्ट्यासाठी प्रसिद्ध आहेत. मुलांसाठी त्यांनी 'उलटा वृक्ष', 'सितारोंसे आगे' ह्या अद्भुतरम्य

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कादंबऱ्या आणि हमारा घर, खरगोश का सपना, दूर देश की कहानियाँ, आदी कथासंग्रहांची पुस्तके प्रस्तुत केली आहेत.

याशिवाय दरवाजे खोल दो, नए गुलाम, ही नाटके व सराय के बाहर हा एकांकी संग्रह प्रसिद्ध असून, आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरूनही त्यांचे साहित्य सतत प्रसारित होत असते.

उडानें, या कथासंग्रहात उर्दूतील श्रेष्ठ साहित्यिकांच्या कथांची जी निवड केली आहे. त्यात संपादक म्हणून कृष्णचंद्रांचे स्थान विशेष आहे.

कथाकादंबऱ्याप्रमाणेंच कृष्णचंद्रांनी विनोदी लेखही लिहिलें आहेत. त्यांचे हे लेखन स्टीफन लीकॉकच्या धर्तीवर लिहिल्यासारखे वाटते. 'घुंघटमें गोरी जले', 'कबूतर के खत' या पुस्तकात त्यांच्या विनोदी लेखाचा समावेश असून खलल है दिमाग का, नहाना, गाना, सेहत खराब है, खाँसी, केवल एक कार, तम्बाकु के रसगुल्ले हे लेख डौलदार व बहारदार आहेत

'सरगम' या त्यांच्या पुस्तकात पं. नेहरू, उपेन्द्रनाथ अश्क, इस्मत चुगताई, सादत हसन मंटो, आदीं परिचयात्मक लेख असून ते त्यांच्या ढंगदार लेखनशैलीमुळे गाजले आहेत.

पानी का पेड, काला सूरज, चौराहे का कुआँ, लकडी का झुनझुना, या कृष्णचंद्रांच्या कथा लोककथेच्या धर्तीवर आहेत. ह्यात रहस्यमयता अधिक असली तरी बोधकताही कमी नाही.

कृष्णचंद्र आपले रडगाणे ऐकवून दुसऱ्याला रडवीत नाहीत. ते एक जागरूक लेखक असून अत्यंत सूक्ष्म रीतीने समाजाचे अवलोकन करतात व आपल्या लेखनात चालू घडामोडींचे अभ्यासपूर्ण, मनोरंजक व विचाराला चालना देणारे वास्तवदर्शी चित्रण करतात. त्यांनी मक्की के दाने, अखिल भारतीय बकरी बन्द, सोनोरा, मंगल ग्रह का यात्री, कैदी या उत्तम कथा अशाच प्रकारे लिहिल्या आहेत.

१९३६ ते ६० पर्यंतचे युग हे उर्दू कथांचे सुवर्णयुग असून सध्या ते कृष्णचंद्र आणि राजेंद्रसिंह बेदी यांचे युग मानले पाहिजे असे एक समीक्षक डॉ. राही मासूम रजा यांनी म्हटले आहे. (सारिका, जून १९६८). त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की कृष्णचंद्रांनी विविध विषयांवर लेखन करून साहित्यक्षेत्रात एक पूज्यस्थान निर्माण केले आहे. ते पुढे म्हणतात : 'कृष्ण चन्दरने जो दुनिया बनायी है वह एक गांव, सुबा या मुल्क नहीं है. उनकी बनाई हुई दुनिया हमारी दुनियासे कुछ बडी ही होगी और शायद ही दुनियाके किसी कथाकार की दुनिया में इतने किस्मों के लोग आबाद मिले जो इनकी दुनिया में आबाद हैं. मैं उन्हें अच्छा ही नहीं बल्की बड़ा कथाकार मानता हूं'.

कृष्णचंद्रांचे वास्तव्य सध्यां मुंबईत असून, विविध मासिकातून लेखन करीत असतानाच ते चित्रपटांसाठीही पुष्कळ लेखन करतात. हमारा घर (मुलांसाठी), बिरादरी, ममता इत्यादि चित्रपटांचे संवाद-लेखन त्यांनीच केलेले आहे. फार पूर्वी कृष्णचंद्रांनी व प्रसिद्ध साहित्यिक स्व. सआदत हसन मंटो यांनी मिळून एक 'बनजारा' नावाची चित्रपटकथाही लिहली होती व त्यावेळी तरी ती अभिनव ठरली होती,

अलिकडेच कृष्णचंद्रांना उर्दूचे श्रेष्ठ साहित्यिक म्हणून १९६६ साली भारतातील 'सोविएत देश' पाक्षिकाने आठ हजार रुपयांचे नेहरू पारितोषिक प्रदान करून त्यांचा गौरव केला आहे.

कृष्णचंद्र आपल्या 'आईने के सामने' या एका प्रस्तावना लेखात स्वतःसंबंधी म्हणतात, 'जीवनात मी जे काही भले बुरे अनुभव घेतले व खस्ता खाल्ल्या त्याच अनुभवाच्या भांडवलावर माझा साहित्यसंसार उभा झालेला आहे. मला आलेले विविध अनुभव इतके आहेत की ते मला दोन आयुष्ये पुरतील. त्यांच्या साहित्याचा व्याप पाहिला म्हणजे त्यांच्या या अनुभवाची प्रचीती सहजतेने येते.

कृष्णचंद्रांच्या लेखणीच्या किमयेमुळेच त्यांना आज कलम के जादूगर म्हणून ओळखले जाते आणि त्यांची तुलना श्रेष्ठ साहित्यिक स्व. मुन्शी प्रेमचंद यांचेशी करण्यात येते, यातच कृष्णचंद्रांचे भारतीय साहित्यातील स्थान सिद्ध होते.

नुकतेच, २६ नोव्हेंबर रोजी कृष्णचंद्रांनी ५५ व्या वर्षांत पदार्पण केले, त्यानिमित्त मुंबईत ' जश्न-ए-कृष्णचंदर ' असा मथळा देऊन एक भव्य साहित्य-महोत्सव साजरा झाला. कृष्णचंद्रांच्या सत्कारानिमित्त

[पान २४० वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वणी येथील प्राध्यापक परिषद

लेखक – प्रा. गोविंद देशपांडे, यवतमाळ.

नागपूर विद्यापीठातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांची पहिली परिषद १३ व १४ ऑक्टोबरला डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली वणी येथे पार पडली. कदाचित पहिलेपणाच्या 'गोड' अनुभूतीमुळे असेल किंवा आणखी कशामुळे असेल पण कार्यकर्त्यांमध्ये आणि प्रतिनिधींमध्ये अमाप उत्साह आढळत होता.

"नागपुर विद्यापीठाचा कुलगुरु म्हणून नव्हे तर एकेकाळचा मराठीचा प्राध्यापक म्हणून या अधिवेशनास उपस्थित राहताना मला आनंद होत आहे", असे उद्‌गार डॉ. वि. भि. कोलते यांनी काढताच त्यांच्याबद्दल जवळीक निर्माण झाली, आणि भाग्याची गोष्ट अशी की माननीय कुलगुरूही कुलगुरू म्हणून न वावरता मराठीचे प्राध्यापक म्हणून वावरले. विविध विषयांच्या परिषदांचे उद्‌घाटन हे त्यांचा नित्याचे कार्य बनले असले तरी या ठिकाणी मात्र डॉ. कोलते यांच्यामधील प्राध्यापक जागा झाला होता. नव्या पिढीतील लोकांना डॉ. कोलत्यांचे 'प्राध्यापक' म्हणून दर्शन दुर्मिळ झाले आहे, हे घडवून देण्याचेच कार्य या परिषदेने करून दिले असते तरीही परिषदेचे माहात्म्य वाढले असते.

सन्माननीय पाहुणे म्हणून ज्यांचा वारंवार परिचय करून देण्यात येत होता ते मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. वा. ल. कुळकर्णी पाहुण्यांचा परकेपणा सोडून वागले. एवढेच नव्हे तर मीही एक सदस्यच आहे या भावनेने वागता यावे म्हणून मराठी प्राध्यापकांसाठी ठेवलेले सदस्य-शुल्क देखील त्यांनी दिले. अशा आपुलकीच्या आणि जवळिकेच्या भावनेने अधिवेशने भरू लागली तर अनेक समस्या सहजगत्या सुटू शकतील.

१३ ऑक्टोबरचा दिवस ! सायंकाळची वेळ ! वणीच्या लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे सभागृह भरगच्च भरले होते. व्यासपीठावर मागील बाजूस 'माझा मराठाचि बोलु कवतुके' असे अभिमानाने म्हणणाऱ्या ज्ञानदेवांची आणि लोकमान्य टिळकांची प्रतिमा ठेवली होती. उदबत्त्यांचा सुवास दरवळत होता. स्वर्गीय राष्ट्रसंतांना श्रद्धांजली समर्पण करण्यात आली. सर्वांची अंतःकरणे भरून आली होती. मूक मनाने आणि अश्रुपूर्ण नयनाने शोकसंवेदना व्यक्त केल्या आणि परिषदेच्या कार्याला सुरवात झाली.

ज्ञानदेवांच्या प्रतिमेला पुष्पहार समर्पण करून माननीय कुलगुरूंनी परिषदेचे उद्‌घाटन केले. प्राचार्य राम शेवाळकरांच्या रसवंतीने स्वागत झाले. स्वागताचे सारे उपचार सांभाळले गेले. नागपूर विद्यापीठातील मराठीचे ज्येष्ठ प्राध्यापक, पदव्युत्तर अभ्यासक्रम विभागाचे प्रमुख डॉ. अ. ना. देशपांडे हे विद्यापीठातील मराठीचे पहिले प्राध्यापक (प्रोफेसर) झाल्यामुळे त्यांचा सत्कार व्हावयाचा होता. आतापर्यंत 'रीडर'ची जागा होती, पण आता तेथे 'प्रोफेसर' आला त्याबद्दल प्राध्यापक परिषदेने आनंद व्यक्त केला. मराठीतील महाकाव्यावरील प्रबंधामुळे ज्यांना गेल्या वर्षीच पीएच्. डी. चा सन्मान मिळाला ते डॉ. द. भि. कुळकर्णी आणि 'मराठी लघुकथेची वाटचाल' या विषयावर प्रबंधलेखन करून मराठवाडा विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी संपादन केलेले अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. भालचंद्र फडके हे व्यासपीठावर होते. या तिघांच्या सत्काराने परिषदेला सुरुवात झाली हे लक्षणीय मानावे लागेल.

डॉ. वि. भि. कोलते यांनी मराठी राज्यभाषा झाल्यामुळे व सर्व विषयांचे अध्ययन-अध्यापन मराठीतून होत असल्यामुळे मराठीच्या प्राध्यापकाची जबाबदारी वाढल्याचे सांगितले. आपल्या भाषणात ते म्हणाले, "अपरिहार्य मराठी शिकवीत असताना आमचे प्राध्यापक विषयाच्या वाङ्मयीन भागावर विशेष जोर देतात. वस्तुतः आपणाला केवळ मराठी साहित्याचे अध्यापन करायचे नसते, तर भाषेचेही करावयाचे असते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. सुलभ, सुंदर, वाक्प्रचारयुक्त मराठीचे वळण विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देण्याचेही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्य आपणालाच करावयाचे आहे", असा मोलाचा विचार मांडून कुलगुरू म्हणाले, "प्राध्यापकांना इतरांच्या तुलनेने रिकामा वेळ जास्त असतो. उर्वरित वेळ भाषेच्या व वाङमयाच्या अध्ययनात खर्च केला पाहिजे. मराठी वाङमय हे संस्कृत आणि इंग्रजीवर आधारलेले असल्यामुळे मराठी वाङमयाच्या अध्यापनासाठी आपण त्यांची ओळख करून घेतली पाहिजे." या आवाहनात कुलगुरूंची तळमळ जाणवत होती.

परिषदेचे अध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख यांनी आपले मुद्रित व्याख्यान वाचून दाखविले, "मराठीमध्ये जे अभिरुचिसंपन्न आणि शाश्वत विचारधन साठवून ठेवले आहे ते आपल्यासमोरील पिढीच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी प्रामुख्याने मराठीच्या प्राध्यापकांवर आहे"; असे सांगून डॉ. देशमुख पुढे म्हणाले, "शिकविणे ही प्रदानप्रक्रिया नाही. ती आदानप्रक्रियाच आहे. प्रत्यही नवे वाङमय, नवे साहित्य व नवे नवे ज्ञान ग्रहण करणे व आपल्या ज्ञानाची पातळी अधिकाधिक उंचावणे याचेच दुसरे नाव अध्यापन आहे." व्याख्यानात्मक एकमार्गी ('वन वे ट्रॅफिक') अध्यापनपद्धती, गतार्थ परीक्षा पद्धती यावर सडेतोड विचार त्यांनी आपल्या भाषणातून मांडले.

याच वेळी सत्काराला उत्तर देणारे डॉ. अ. ना. देशपांडे यांचे प्रभावी भाषण झाले.

o o o o o

"नेमेचि येतो मग पावसाळा
हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा"

असे स्वरूप आजकाल कुठल्याही संमेलनांना प्राप्त होत आहे. कुठल्याही मूलगामी चर्चा, समस्यचे निराकरण झाल्याचे समाधान अपवादानेच लाभते. त्या अपवादात वणी परिषदेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

'मराठीचा पाठचक्रम' या विषयावरील पहिल्या चर्चासत्रात पाठ्यक्रम कसा आहे, कसा असावा व कसा नसावा यासंबंधी काही निबंध मागविले होते. त्या निबंधांच्या अनुषगाने महत्त्वाची चर्चा झाली. 'माझी अध्यापनाची भूमिका' हे दुसरे चर्चासत्र तर चिरकाल ध्यानात राहील. प्रा. म. ना. लोही, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. शरच्चचंद्र टोंगो, डॉ. द. ह. अग्निहोत्री, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. भा. दि. फडके यांची भाषणे फारच मननीय झाली. याच वेळी डॉ. वि. मि. कोलते यांनी 'अविकार तैसा करू उपदेश' हा अभंग चर्चेसाठी घेऊन सुमारे ३५-३७ मिनिटांचा आदर्श पाठ घेतला मी पाठ घेणार नाही असे म्हणत असतानाच त्यांच्यातील जाग्या झालेल्या प्राध्यापकाने अभंग शिकविला. त्यांनी डॉ. द. मि. व प्रा. लोही यांना प्रश्न विचारले त्यापैकी एका प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न अध्यक्ष डॉ. देशमुख यांनी करताच प्रा. कोलते म्हणाले, 'मी प्रश्न तुम्हाला विचारला नाही.' प्रा. कोलत्यांच्या या पाठाची सुरुवातच इतकी पकड घेणारी होती की त्याचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. "काल उद्घाटनाच्या भाषणात मा. कुलगुरूंनी आपणाला जे सांगितले त्याचेच थोडे विवेचन करण्याचा प्रयत्न करू. काल मा. कुलगुरू म्हणाले...." असे प्रा. कोलते प्रारंभीच म्हणाले. बहुसंख्य नव्या प्राध्यापकांच्या दृष्टीने हा पाठ म्हणजे पर्वणीच ठरली.

त्याच वेळी प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचे मननीय असे भाषण झाले. ते प्रारंभीच म्हणाले, "मराठी हा विषय फार सोपा आहे व जे जे मराठीत लिहिले गेले त्याचा मी शिक्षक आहे असे दोन गैरसमज प्रसृत झाले आहेत. रसायनशास्त्राचा प्राध्यापक मी Organic Chemistry चा प्राध्यापक असल्याचे सांगतो, त्यात त्याला कमीपणा वाटत नाही. तद्वतच 'वादळी वारे' किंवा माटयांची 'विज्ञानबोधाची प्रस्तावना' हे ग्रंथ शिकविण्यास मी पात्र आहे का ? ही जबाबदारी मी पेलू शकेन का ? याचा आपण विचार केला पाहिजे. मी फक्त मराठी वाङ्मयाचा विद्यार्थी आहे ही जाण आपण ठेवली पाहिजे. शिवाय केवळ वाङ्मयाचा व्यासंग करायचे म्हटले तरी आयुष्याची कितीतरी वर्षे पुरणार नाहीत. आपणास एकाच वेळी अनेक गोष्टी कराव्या लागतात. आपल्याला जर खरोखर प्रगती करावयाची असेल तर specialisation केले पाहिजे." केवळ मराठीवरच गुजराण करू नका असे आग्रहाने प्रतिपादन करताना वा. ल. पुढे म्हणाले, "मराठीच्या निमित्ताने मी सर्वच वाङमयाचा विद्यार्थी आहे. सर्व साहित्याचा मला परिचय करून घेता आला पाहिजे. शिवाय मराठीच्या अभ्यासकाला संदर्भग्रंथांची फार उणीव जाणवते. ही उणीव भरून काढण्याला प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे हातभार लावला पाहिजे." या व्याख्यानात "समीक्षा कमी वाचली तरी चालेल, पण साहित्य भरपूर वाचले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहिजे. साहित्य बाजूला ठेवून समीक्षा वाचण्याइतका भयानक गुन्हा मी दुसरा कोणता मानत नाही, " असे विचार त्यांनी मांडले. प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचे हे पासष्ट मिनिटे चाललेले व्याख्यान अनेक दृष्टींनी मार्गदर्शक होते.

तिसऱ्या चर्चासत्राला प्रामुख्याने प्रश्नोत्तराचे स्वरूप प्राप्त झाले. अनेक शंकांचे निरसन झाले. याचवेळी प्राध्यापकांचा परस्परांशी परिचय झाला.

आणि चौदा ऑक्टोबरला समारोपाची वेळ आली. मनात हुरहूर निर्माण झाली. हे एवढ्या लवकर संपणार या विचाराने मनात काहूर उठले. पहिले अधिवेशन छोट्या स्वरूपातच घ्यावे ही डॉ. मा. गो. देशमुखांची सूचना होती. यावेळी मात्र ते खटकल्याशिवाय राहिले नाही. काही गोष्टी अशा असतात की त्या केव्हा संपतात याची आपण सारखी वाट पहात असतो आणि काही गोष्टी अशा असतात की त्या इतक्या लवकर का संपल्या याचीच चुटपुट लागते. मराठी प्राध्यापक परिषदेच्या या अधिवेशनाचा समावेश दुसऱ्या प्रकारातच करावा लागतो याचा कुणालाही अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. देशमुखांच्या अध्यक्षतेखाली एक घटना समिती नियुक्त करण्यात आली त्यात सर्वश्री प्राचार्य राम शेवाळकर, प्राचार्य भाऊ मांडवकर, डॉ. भा. दि. फडके व प्रा. ग. वा. करंदीकर यांचा समावेश आहे.

"आपण संतांचे आणि श्रेष्ठ लोकांचे विचार विद्यार्थ्यांना शिकवितो ते त्यांनी आचरणात आणावे अशी आपली अपेक्षा असते, परंतु आपले आचरण मात्र तसे नसते, ही फार मोठी विसंगती आहे हे लक्षात घेऊन उपाय शोधला पाहिजे. शिवाय आपला विद्यार्थी हा आपल्या ताब्यात नसतो तर अधिकांश वेळ इतर अनेकांच्या ताब्यात असतो. हे आपण टाळू शकत नाही म्हणून आपल्या शिक्षणाचा त्याच्या मनावर काही परिणाम होत नाही," असे मर्मग्राही विवेचन आपल्या समारोपाच्या भाषणात अध्यक्षांनी केले. डॉ. मा. गो. देशमुख यांच्या औपरोधिक, विनोदी पण तेवढ्याच विचारप्रवर्तक भाषणाचा लाभ समारोपाच्या निमित्ताने पुन्हा एकदा घडला.

याचबरोबर उपस्थित प्राध्यापक कवींचे कविसंमेलन-प्राध्यापक साहित्यिकांच्या ग्रंथांचे प्रदर्शन व डॉ. बाबासाहेब देशपांडे यांचे तारशहनाईवादन आदि कार्यक्रमांचे संयोजन करण्यात आले होते. स्वागताध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर मोठे फूल लावून संमेलनात सर्वत्र वावरत होते पण त्यांना असे उभे राहण्यासाठी अनेकांचे साह्य लागत होते. त्यात प्रा. वामनराव देशपांडे, प्रा. शरच्चंद्र टोंगो व प्राचार्य पुंडरिक धुमाळे हे तीन उपाध्यक्ष, प्रा. शांताराम कवडे, प्रा. ग. वा. करंदीकर व प्रा. गोविंद देशपांडे हे तीन कार्यवाह यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. 'नाही चिरा नाही पणती' परंतु दिव्यत्वाची प्रचीती घडवून देणारी कितीतरी कार्य करणारी मंडळी आहेत. स्वागत समिती, भोजन समिती, निवास समिती, विद्यार्थी परीषदेचे चहापान व्यवस्था करणारे कार्यकर्ते, सर्व कार्यक्रम ध्वनिमुद्रित करण्यासाठी जिवाचे रान करणारे श्री. सुधाकरराव पुराणिक अशा सर्वांचे परिश्रम या परिषदेच्या यशस्वितेला कारणीभूत झाले. श्री. शेवाळकरांचा आवाज या सर्वांच्या सहकार्यामुळेच उमटू शकला असे म्हटले तर ते त्यांनाही अमान्य होणार नाही. मराठीच्या अध्यापनाशी ज्यांचा मुळीच संबंध नाही असे प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे हेही अगत्याने उपस्थित होते हेही भूषणच.

वणीकरांचे स्वागत, सौजन्य आणि आतिथ्य यांचा लाभ घेऊन परत जात असताना अंतर्मनात कुठेतरी एका प्रसिद्धीपासून दूर असणाऱ्या कार्यकर्त्याचं स्मरण होत होतं. संमेलनाला आलेल्या फार थोड्या व्यक्तींना त्या मोठ्या माणसाची ओळख झाली असेल, त्या माणसाचं नाव आहे, श्री. भैयाजी ढुमे ! मराठीचा प्राध्यापक नाही, ही परिषद न झाली तरी ज्याला सुतक येणार नाही असा हा माणूस ! का एवढा धडपडत होता कुणास ठाऊक ! दिनांक ११ ला रात्री १०–३० च्या सुमारास बहिणीच्या यजमानांच्या मृत्यूची बातमी आली. भैयाजींनी जाणे आवश्यक होते. परंतु ओल्या झालेल्या डोळ्यांच्या कडा धोतराने पुसत भैयाजी म्हणाले, "काय उपयोग आहे आता मी जाऊन ! सिरिअस असते तर मी गेलो असतो. आता परिषद आटोपल्यावरच जाईन !" आणि खरोखरच ते आपल्या नवविधवा बहिणीच्या सांत्वनाला संमेलन संपताच निघून गेले.

लोकनायकांची वणी अजून जिवंत आहे तर .... !

★

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथपरिचय

चंद्रकांत कुळकर्णी

आधुनिक मराठी कविता

लेखक :–भवानीशंकर श्रीधर पंडित

सुविचार प्रकाशन नागपूर; किंमत ८ रुपये

प्रा. भ. श्री. पंडित हे कवि आणि काव्यसमीक्षक या दोन्ही नात्यांनी मराठी अभ्यासकांना परिचीत आहेत. आधुनिक मराठी कवि आणि त्यांचे काव्य यासंबंधीचा अत्यंत सखोल व प्रदीर्घ व्यासंग हे प्रा. पंडितांच्या अभ्यासाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'समग्र केशवसुत', 'उघडी नयन' 'पांच चितनिका', 'संचय' इ. काव्यसमीक्षा करणारे ग्रंथ त्यांच्या सखोल व्यासंगाची साक्ष देतात. अशा या रसिक व मार्मिक काव्यसमीक्षकाच्या 'आधुनिक मराठी कविता' या ग्रंथाची संस्कारित द्वितीयावृत्ती नुकतीच प्रकाशित झाली आहे. प्रस्तुत पुस्तकात इ. स. १८१८ पासून आधुनिक कालखंडापर्यंतच्या कवितेचे सम्यक् दर्शन घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या पुस्तकाच्या प्रथमावृत्तींत 'प्रगतीशील कवि' आणि 'प्रचलित कवि' ही शेवटची दोन प्रकरणे विस्कळित होती. ती या आवृत्तीत अ-स्खलित केली आहेत. प्रमुख नव्या-जुन्या कवींची रेखाचित्रें या आवृत्तीत देण्यात आली आहेत. हे या संस्कारित आवृत्तीचे आणखी एक वैशिष्ट्य.

सोपानदेवी

लेखक :–सोपानदेव चौधरी यांच्या निवडक कविता

प्रकाशक :–ठोकळ प्रकाशन पुणे; किंमत आठ रुपये

आपल्या काव्यगायनाने कविसंमेलनाचा फड हमखास जिंकणारे कवी म्हणून सोपानदेव चौधरींची ख्याती आहे. 'काव्यकेतकी' व 'अनुपमा' हे त्यांचे दोन कवितासंग्रह यापूर्वीच प्रसिद्ध झालेले आहेत. प्रस्तुत काव्यसंग्रहात सोपानदेव चौधरीच्या निवडक कविता एकत्रित करण्यात आलेल्या आहेत. आचार्य अत्रे यांनी या काव्यसंग्रहाला 'सोपानदेवी' हे आकर्षक नांव दिलेले आहे. सोपानदेव चौधरींच्या धर्मपत्नी कै. सौ. लिलादेवी यांना साहित्य-लक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक 'सोपानदेवी' या लाडक्या नांवानेच संबोधित असत.

वाङ्मयीन मुल्ये (समीक्षा)

लेखक :–श्री. के क्षीरसागर

प्रकाशक :–डी. जी. जोशी पुणे;

किंमत–५ रुपये (आवृत्ती दुसरी)

प्रा. श्री. के. क्षीरसागर यांची मराठी समीक्षा वाङ्मयात स्वतंत्र विचाराचे टीकाकार व विचारवंत म्हणून ख्याती आहे 'सुवर्णतुला', 'वादसंवाद', 'साहित्याच्या दरबारात', 'टीकाविवेक'. इ. अनेक ग्रंथ त्यांच्या सखोल अभ्यासाची निदर्शक आहेत. प्रस्तुत पुस्तकाची पहिली आवृत्ति निघून बरेच दिवस झाले. या नव्या आवृत्तीत दोन महत्वाचे विषय अन्तर्भूत केले आहेत, ते म्हणजे 'नवकाव्य' आणि 'नवकथा' याशिवाय 'साहित्यातील सोवळेपणा', 'वाङ्मयातील जडवाद',–'महाराष्ट्रीय सौंदर्यवाद', 'अश्लीलतावाद', 'तंत्र आणि अनुभूति' इ. महत्त्वाच्या वाङ्मयीनवादांचे टीकात्मक विवेचन प्रस्तुत समीक्षा ग्रंथात करण्यात आले आहे.

वाङमय विचार (समीक्षा)

लेखक :–गं. ब. ग्रामोपाध्ये

व्हीनस प्रकाशन–पुणे; किंमत–७.५० रुपये

डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये हे एक साक्षेपी टीकाकार म्हणून मराठी अभ्यासकांना अनेक वर्षे परिचित आहेत. मोजके आणि उत्तम दर्जाचे समीक्षा लेखन ही त्यांची महत्त्वाची वाङमयीन कामगिरी संतसाहित्यापासून ते अर्वाचीन साहित्यापर्यंत त्यांनी 'वाङमयविचार' केला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. 'संतकाव्य समालोचन', 'वाङ्मयीन' मुल्ये आणि जीवनमूल्ये', 'मराठी बखर गद्य', 'भाषा विचार आणि मराठी भाषा' इ. अनेक समीक्षा ग्रंथातून त्यांचा व्यासंगी व मूलगामी टीकाविचार अनुभवास येईल. प्रस्तुत समीक्षा ग्रंथ म्हणजे डॉ. ग्रामोपाध्ये यांनी गेल्या कांही वर्षांच्या काळात वेगवेगळया वेळी लिहिलेल्या वाङ्मय-विषयक स्फुट लेखांचा संग्रह आहे. या संग्रहात एकूण सोळा वाङ्मयविषयक लेख असून त्याचे स्वरुप थोडे-फार भिन्न आहे. त्यात वाङ्मयविषयक प्रश्नांचा जसा विचार आहे तसा वाङ्मयप्रकाराबाबतचाही विचार आहे. विशेष म्हणजे या संग्रहात अर्वाचीन वाङ्मय-यविषयक लेखांबरोबर प्राचीन वाङ्मयाबाबतचेहि लेख आहेत. 'महानुभावीय मराठी गद्याचा विकास', मराठी कथा: चक्रधर ते हरिभाऊ', एकनाथ : व्यक्तिदर्शन, नवेकाव्य आणि जुना घोळ, लेखक–वाचक संबंध, आख्यानक कविता, केशवसुतांची कविता: परंपरा आणि प्रयोग इ. महत्त्वाचे लेख या संग्रहात समाविष्ट करण्यात आले आहेत.

अहेर

(केशवरावदाते अमृत महोत्सव अहेर)

संपादक :–सखारामपंत जोशी

आज मराठी रंगभूमीवर विद्यमान असलेल्या गेल्या पिढीतील कर्तबगार पुरुषांत श्री. केशवराव दाते अग्र-गण्य आहेत. मराठी गद्य रंगभूमीचे थोर शिल्पकार या नात्याने मराठी रंगभूमीवरील त्यांची कामगिरी फार मोठी आहे. अशा या थोर कलावंताचा अमृतमहोत्सव १९६४ साली महाराष्ट्रात धुमधडाक्याने साजरा करण्यात आला. नागपूर शहरातही हा समारंभ थाटात साजरा करण्यात आला. या प्रसंगी अनेक अहेर दात्यांना देण्यात आले; परंतु कांही काही कारणाने हा शब्दरूपी अहेर त्यावेळी देता आला नाही. तो आता प्रसिद्ध झाला आहे. हा अहेर प्रामुख्याने व 'मराठी नाटके–माझा छंद' या प्रसिद्ध ग्रंथाचे कर्ते नासिकचे श्री. वामनराव पुरोहित यांचा आहे. श्री. दाते आणि श्री. पुरोहित यांचे जिव्हाळयाचे संबंध उत्तम नट आणि जागता प्रेक्षक या दोन परस्पर पूरक आणि परस्पर साहाय्यक या भूमिकातून जडलेले आहेत. दात्यांच्या एकसष्टीच्या निमित्ताने पुरोहितांनी त्यांच्या गौरवपर आणि तदनुषंगिक नाट्यविषयास अनुलक्षून चौदा पात्रांचा 'अहेर' केला. तोच हा 'अहेर' याशिवाय या 'अहेरात' शब्दरूपी अहेर देणारे लेखक आहेत श्री. सखारामपंत जोशी, श्री. राजाभाऊ परांजपे, श्री. भाऊसाहेब पंडित, श्री. खांत्रेटे व श्री. तात्यासाहेब भोळे. केशवरावांचे चिरंजीव श्री. रघुवीर दाते यांनी 'तेथे कर माझे जुळती' हा लेख अहेर मध्ये देऊन आपल्या कलावंत पित्याला आदरांजली वाहिली आहे. केशवरावांचे नाट्यविषयक चिंतन, व मनोगत लहान लहान चौकटीतून देण्यात आले आहे. नागपूरचे सुप्रसिद्ध नाट्य कलावंत व केशवरावांचे शिष्य श्री. सखारामपंत जोशी यांनी 'अहेर' नामक पुस्तिकेचे संपादन केले आहे, या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मराठी रंग-भूमीच्या १२५ व्या वाढदिनी करण्यात आला.

कृष्णचंद्र .. पान २३५ वरुन

आयोजित करण्यात आलेल्या या सत्कारसमारंभाचे अध्यक्षस्थान पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वीकारले होते व उर्दूप्रमाणेच हिंदी, मराठी, गुजराती, तामीळ, तेलगु, पंजाबी, सिंधी, बंगाली वगैरे भाषांच्या साहित्यिकांनी त्यात भाग घेऊन व भेटी देऊन त्यांचा गौरव केला. मराठी साहित्यिकांच्या वतीने आचार्य अत्रे यांनी त्यांना चांदीचा लामणदिवा भेट म्हणून अर्पण केला. या सत्कारसमारंभाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले होते हीच 'कृष्णचद्र' हे केवळ उर्दूचे नव्हे तर समग्र भारताचे एक श्रेष्ठ साहित्यकार आहेत याची साक्ष होती.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारतीय कलेतील बुद्धाचा आविष्कार

आत्माराम रावजी देशपांडे 'अनिल'

गौतम बुद्ध ही एक अशी अलौकिक आणि महान व्यक्ती भारतात अडीच हजार वर्षांपूर्वी होऊन गेली की तिचा प्रभाव नुसत्या भारतातच नव्हे तर मध्य आशियात आणि सुदूर पूर्वेस असलेल्या जपानसारख्या देशातहि पडला. त्या प्रभावाने त्या प्रदेशातील लोकांच्या जीवनात, धार्मिक आचारात, वैचारिक दर्शनात आणि सांस्कृतिक कलांच्या क्षेत्रात फार मोठी स्थित्यंतरे घडवून आणली. एक नवे चैतन्य निर्माण केले. त्या प्रभावाची आता पुन्हा नव्याने सर्व जगभर जाणीव होत आहे. अशा थोर व्यक्तीचा भारतीय कलेत आविष्कार कसा झाला ते आज आपल्याला पहायचे आहे. सिंहलद्वीप, ब्रम्हदेश, तिबेट, श्याम, कंबोज, चीन, जपान, गांधार, मध्यआशिया अथवा शाकस्थान, जिथे जिथे म्हणून बुद्धधर्म जाऊन पोहोचला तिथे तिथे त्या लोकांच्या कलेमध्ये बुद्धाचा आविष्कार झालेला आहे. कलेतील बुद्धाच्या आविष्कारासंबंधी एक गोष्ट सदैव जाणवत राहते. तो आविष्कार त्या त्या प्रदेशातील लोकांच्या जीवनाशी इतका समरस होऊन जातो की वाटू लागते, बुद्ध ही त्या प्रदेशात आणि त्या लोकसमूहात होऊन गेलेलीच एक महान अवतारी व्यक्ती असावी.

एकाद्या व्यक्तीचा अथवा व्यक्तित्वाचा कलेतील आविष्कार पहायचा असला म्हणजे आपल्याला दृक्प्रत्ययात्मक कलांकडे बघावे लागते. दृक्प्रत्ययात्मक कला म्हणजे डोळ्यांनी पाहिल्यामुळे ज्या कलेतील अभिव्यक्तीचा हृदयावर परिणाम होतो त्या कला. मुख्यत: मूर्तिकला आणि चित्रकला. आजच्या विषयाच्या संदर्भात आपण ह्या दोन भारतीय कलातील आविष्कारासंबंधीचा विचार करू.

भारतीय मूर्तिकलेत आणि चित्रकलेत बुद्धाचा आविष्कार होऊ लागण्यापूर्वीहि ह्या कला बऱ्याच प्रौढ अवस्थेत प्रगत झालेल्या असाव्या असे मानण्यास ऐतिहासिक पुरावे बरेच आहेत. सुमारे चार-पाच हजार वर्षांपूर्वीचे मोहेंजोदारो-हरप्पा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीचे, उत्खननात उपलब्ध झालेले अवशेष पाहिले तर दिसून येते की मूर्तिकला बरीच प्रगत झालेली होती आणि कौशल्याने विदग्धतेची सीमा गाठलेली होती. चित्रकलेचे अवशेष मिळणे कठीण, कारण ते मूर्तीइतके टिकाऊ नसतात. मोहेंजोदारो-हराप्पा कालखंडापासून तो बुद्धपूर्वकाळापर्यंतचे अवशेष मात्र क्वचितच मिळतात. ह्या तृटीमुळे बुद्धकाळापर्यंतचा मूर्तिकलेचा आणि चित्रकलेचा भारतातील विकास आपणास नीटपणे समजत नाही. संस्कृत वाङ्मयात मात्र चित्रांचे उल्लेख आढळतात. रामायणात तर चित्रागाराचे वर्णनहि आलेले आहे.

बुद्धोत्तर काळातल्या भारतीय मूर्तिकलेचा आणि चित्रकलेचा विकास सुसंबद्ध रीतीने दिसून येईल, इतक्या मूर्ती आणि चित्रे, खंडित अवस्थेत का होईना, अजून उपलब्ध आहेत हे आपले भाग्य.

ज्या धर्मांचा उद्भव 'पौरुषेय' असतो, त्या धर्मात, त्या धर्माचे प्रवर्तन करणाऱ्या व्यक्तीला एक अनन्य स्थान असते. त्या धर्मसंस्थापकाचे जीवन, चरित्र, विचार, आचार, उपदेश आणि इतर सर्व गोष्टींशी तो धर्म आपोआप आणि अपरिहार्यपणे संबंधित असतो. कालांतराने अधिकच निगडित होतो. त्या धर्मसंस्थापकाला तथागत, अवतार आणि भगवान मानण्यात येते. बुद्धधर्माचा इतिहास हेच दाखवितो.

शेवटल्या आजारातून थोडे बरे झाल्यानंतर शिष्यश्रेष्ठ आनंद ह्याने भगवान बुद्धाला, भिक्षुसंघाला अंतिम उपदेश करावयास विनविले. तेव्हा भगवान बुद्ध म्हणाले, "माझ्या निर्वाणानंतर तुम्ही स्वत:वरच अवलंबून राहा. आत्म्यालाच दीप बनवा. धर्मालाच दीप बनवा." ह्याचा अर्थ भगवान बुद्धाला हा अभिप्रेत होता की त्याला धर्माचे सर्वस्व असे उपास्य दैवत बनवू नका. हा अंतिम उपदेश मानून पाहिल्याने बौद्धधर्मी-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांचा "विशुद्धिमार्ग" प्रचारांत आला. कलेपासून होणारा आनंद हा इंद्रियजन्य सुखासारखा क्षणिक असल्यामुळे, तो निषिद्ध ठरला. कोणत्याहि कलांना 'विशुद्धि' मार्गाने उत्तेजन दिले नाही. त्या काळात कलाकृतींची अभिव्यक्ती बऱ्हंशी शृंगारप्रधान असली पाहिजे. म्हणून ह्या कट्टर मतांचा स्वीकार करणे विशुद्धिमार्गातील बौद्धधर्मीयांना योग्य वाटले असावे. संघारामात किंवा विहारात भिंतीवर चित्रे काढू नयेत, मूर्ती वसवू नयेत असा त्यावेळी भिक्षूंवर निर्बंध घातला गेला होता. ध्यानधारणेसाठी पुष्पमाळा, लतावेली ह्यांची प्रतीके वनविणे मात्र धर्मसम्मत होते ह्या मोकळिकीतून पुढे बुद्धाचा प्रतीकात्मक आविष्कार होऊ लागला. बुद्धाच्या जीवनातील चार प्रमुख घटना प्रतीकरूपाने मूर्तिशिल्पात आणि चित्रात दाखविल्या जाऊ लागल्या. पहिली घटना बोधिसत्वाचा गर्भसंभव, बुद्धजन्म आणि मग गृहत्याग. ह्या घटना हत्ती, कमळ, नंदी, महाद्वार आणि अश्व ह्या प्रतीकांनी शिल्पित केल्या जाऊ लागल्या. दुसरी महत्वाची घटना गया येथे गौतमाला बोधी प्राप्त झाली ती सभोवार कठडा असलेल्या बोधी वृक्षाच्या प्रतीकाने दाखविली जाऊ लागली. तिसरी महत्वाची घटना सारनाथ येथील पहिला उपदेश आणि धर्मचक्रप्रवर्तन. हे चक्र किंवा हरिण ह्या प्रतीकांनी दर्शित केले जाऊ लागले. चवथी महत्वाची घटना कुशीनगर येथील बुद्धाचे निर्वाण. स्तूप हे ह्या घटनेचे प्रतीक बनले. मूर्तिकलेतील आणि चित्रकलेतील बुद्धाचा आविष्कार असा प्रारंभिक प्रतीकात्मक पद्धतीचा होता.

पण बुद्धाच्या अनुयायांचा हा विशुद्ध उत्साह पुढच्या दोन तीन शतकांत कमी कमी होत जाऊ लागला. बुद्धाच्या प्रभावी व्यक्तित्वाचा आणि त्यांनी उपदेशिलेल्या नीतितत्त्वांचा प्रसार होऊ लागला. सामान्य लोकसमुदायांनी बौद्धधर्माचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला. सर्वसामान्य मानवी मन असे आहे की त्याला सगुणरूप आवडते, आकर्षित करते. त्याला एक सुघटित साकार रूप उपास्य दैवत म्हणून हवेसे वाटते. शून्यवादाच्या नीरससर्व-शून्यतेत त्यांचे भाविक मन रमू शकत नाही. हेलावून येत नाही. म्हणून भगवान बुद्धाच्या मूर्ती बनविण्यात येऊ लागल्या. हीनयान संप्रदायापेक्षा महायान ह्या बुद्धसंप्रदायाने तर बुद्धाचा मूर्तिकलेत आविष्कार करण्यासाठी मोठा देवतागणच निर्माण केला. बोधिसत्त्वाला जन्मजन्मांतराने बुद्धत्व प्राप्त होते असे गौतम बुद्ध मानीत असे. म्हणून परमेश्वरासारखीच आदिबुद्धाची कल्पना करण्यात आली. प्रज्ञेमुळे ह्या आदिबुद्धाची अनेक प्रकटने होतात. त्यांची पाच मुख्य रूपे, ध्यानी बुद्धांच्या मूर्तीमध्ये निर्माण करण्यात आली. वैरोचन, अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ आणि अमोघसिद्ध ह्या नावांनी ओळखली जाणारी ती पाच रूपे. ह्या पाच प्रकारच्या ध्यानी बुद्धांचे प्रकटन पाच बोधिसत्वापासून झाले. त्यांची नांवे समंतभद्र, वज्रपाणि, पद्मपाणि आणि विश्वपाणि. हे बुद्ध आणि बोधिसत्व विश्वाच्या सर्ग आणि स्थितीचे कारक आहेत ही बुद्धधर्मानुयायांची श्रद्धा. ह्यांतल्या पद्मपाणि ह्या बोधिसत्वाला 'अवलोकितेश्वर'हि म्हटले जाते. अवलोकितेश्वराची हिंदुधर्मातल्या वैष्णवांच्या विष्णूप्रमाणेच बुद्धधर्मात उपासना आणि पूजाअर्चा केली जाते.

ख्रिस्तपूर्व दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकात, ह्या बुद्ध देवतागणांच्या आणि अवतारांच्या मूर्ती आणि चित्रे निर्माण करण्यात कलाकार आपल्या सृजनशक्तीची पराकाष्ठा करू लागले. इथें त्यांना भक्तिमार्गाचा अवलंब करावा लागला. तसाच योगातील ध्यानमुद्रांचा. चित्रकारांना तर बुद्धाच्या पूर्वजन्मातील जातक कथा चित्रित करण्यासाठी अनेक प्रसंग मिळाले.

मूर्तिकलेचे-मूर्तिशिल्पाचे शास्त्र आणि तालमान-प्रमाणाचे नियम बौद्धमूर्तिकलेच्या आरंभा आधीच निर्माण झालेले असावेत असे दिसते. शुक्राचार्यांनी 'शुक्रनीतिसार' ह्या ग्रंथात म्हटले आहे की आराधक आणि आराध्य, उपासक आणि उपास्य ह्यांच्यातले जे भावनामय आणि भक्तिपूर्ण संबंध असतात, त्यांच्या वैशिष्ट्यानेच मूर्तीमध्ये प्रकट करण्याचा आविष्कार आणि मूर्तींची लक्षणे निश्चित होत असतात. बुद्धाचा प्रतिमेत आविष्कार करणाऱ्या कलावंतांनी ही मूर्तिशिल्पाची तत्त्वे, नियम आणि शास्त्र पाळलेले दिसतात.

रूपभेदा: प्रमाणानि भावलावण्ययोजनम्

सादृश्यम् वर्णिकाभंगम् इति चित्रम् षडंगकम्

अशी चित्रकलेची सहा अंगे बुद्धचित्रकलेच्या आरंभाआधीच निश्चित झालेली होती. अजिंठा लेण्यांतील भित्तीचित्रांचे निरीक्षण केले तर बौद्ध चित्रकारांनी ती समजून उमजून पाळलेली आहेत हे दिसून येते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मूर्तिकला आणि चित्रकला ह्या दोन प्रमुख भारतीय कलांतील बुद्धाच्या विविध आविष्कारांचा रसास्वाद घेण्याऱ्या आधी ते आविष्कार निर्माण करणाऱ्या कलाकारांची निर्मिति-प्रक्रिया जाणून घेणे अवश्य आहे. ती अशी होती : ज्या विषयाचा कलेच्या माध्यमातून आविष्कार करायचा त्याचा 'दंश' आधी कलाकाराला झाला पाहिजे. 'दंशन' हा ह्या संदर्भात प्राचीन शास्त्रकारांनी वापरलेलाच शब्द आहे. मग त्या विषयाचा रूपाविष्कार कसा करायचा ह्यावर त्याने आपले चित्त एकाग्र केले पाहिजे. इतके की त्या एकाग्रतेला ध्यान-समाधीच म्हणता येईल. त्या ध्यानांवस्थेत कलाकाराला त्या मूर्तीच्या अंगप्रत्यंगाचे, चर्येवरील भावनांचे अंतर्दर्शन झाले पाहिजे. त्या अंतर्दर्शनाची प्रतिकृति मग त्याने मूर्तीत वा चित्रात उतरवायची. असा भारतीय कलाकारांचा निर्मितिव्यापार होता. त्यातूनच बुद्धाचे अनेकविध आविष्कार मूर्तीत आणि चित्रात प्रकटविले गेले. त्या शेकडो मूर्तींचे आणि चित्रांचे नुसते शब्दांनी वर्णन कसे करता येईल ? त्यांचा दृक्प्रत्ययच घ्यायला पाहिजे. आपल्याला अगदी जवळ म्हणजे अजिंठ्याच्या लेण्यांत हे आविष्कार पाहता येतील. आपण 'अवलोकितेश्वर' पद्मपाणि बुद्ध ह्याचा चित्रांतला आविष्कार पाहू. 'कारुण्यरूपं करुणा करं तं' अशी भक्तिभावना पाहणाऱ्याच्या मनात उत्पन्न करील असाच हा आविष्कार. बुद्धाच्या एका ध्यानस्थ मूर्तीच्या मुद्रेवर एका बाजूने पाहिले तर करुणेचे तर दुसऱ्या बाजूने पाहिले तर मैत्रीचे असे द्विविध आविष्कार दिसतात. आराधकाच्या जितक्या विविध भक्तिभावना तितक्या विविधपूर्णतेने, भारतातील मूर्तिकलेत आणि चित्रकलेत कलाकारांनी केलेला असा हा बुद्धाचा प्रत्ययकारी आविष्कार !

आज अचानक गाठ पडे.. [पान २३२ वरून]

आहे. म्हणजे ते दाक्षिणात्य लिंगायत असावेत. अन्य प्रांतीय लोकांच्या मराठी उच्चारणाला जो एक हिंदी भाषेचा किंचित् स्पर्श असतो तोच कुमारांच्याही उच्चारणाला आहे. पण म्हणून काय बिघडले ? एका हिंदी माणसाने मराठीला आपला सच्चा आणि 'विश्वात्मक' सुर द्यावा यापेक्षा मराठीचे भाग्य कुठले ?

अनिलांच्या कवितेचे रसग्रहण करण्याची काही धडपड करताना मी तिच्यातील रस, प्रास, यमक आणि अंतर्यमक आदि घटकांचा उहापोह केलेला नाही. त्याबरोबरच कुमारांच्या आवाजाचाही उल्लेख केलेला नाही. (स्वतंत्रपणे त्या आवाजाचा गुणधर्म प्रपातातून कोसळणाऱ्या बेबंद प्रवाहासारखा आहे.) पण नवल म्हणजे त्या आवाजाचा स्पर्श ज्या गायनप्रकाराला होतो त्यातील सर्व वृत्तींना तो एका ताजेपणाच्या अभिजात माध्यमात द्राव्य करून टाकतो. आणि म्हणूनच त्या आवाजाला अनिलांच्या समर्थ कविता-बंदीशीतील कोनेकोपरे सर्व सामर्थ्यानिशी न्याहाळता येऊ शकले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'बी' कवींचे काव्यविषयक विचार

माधव गोपाळ देशमुख

महाराष्ट्रकविपरंपरा :

प्रत्येक श्रेष्ठ कवीची काही ना काही तरी काव्य-विषयक भूमिका असते व असा कवी आपली भूमिका कधी कधी आपल्या काव्याद्वारे अथवा स्वतंत्रपणे व्यक्त करीत असतो. ही गोष्ट तो हेतुपूर्वक करीत असेल असे नाही. पण कवीच्या अन्तर्मनात दडलेल्या अनंत विषयांपकी काव्य या विषयाला तो जर आगळे महत्त्व देत असेल तर त्याला त्या विषयाचे विशेष अगत्य वाटत असले पाहिजे हे उघड आहे.

एखाद्या कवीला 'काव्य' या विषयाचे इतर विषयांहून विशेष अगत्य वाटते याचा अर्थ त्याबाबतीत त्याला पूर्वकवींहून आपला काही वेगळा दृष्टिकोण मांडावयाचा असतो; अर्थात् त्याला काव्यविषयक पारंपरिक कल्पना बदलवून तेथे नवीन प्रस्थापित करावयाच्या असतात, हे स्पष्ट आहे. तसे पाहिले तर केवळ कालक्रमानुसार नंतर येणारा प्रत्येक कवी आधीच्या कवींहून नवाच असतो; पण कवीचे खरेखुरे नवेपण त्याच्या कालसापेक्षतेवर अवलंबून नसते. ते काव्याच्या संदर्भातील त्याच्या अनन्यपूर्व-कवित्वात असते. कालसापेक्षतेनुसार प्रत्येक कवी पूर्वीच्या कवींहून नवाच असतो; पण श्रेष्ठ कवी हा मात्र काव्यपरंपरेच्या बाबतीत बंडवाला असतो.

ज्ञानेश्वर माने पहिला !

'महाराष्ट्र-कविपरंपरा। खंड न पडला तिला जरा' असे 'बी' कवींनी म्हटले आहे, ते याच अर्थाने. त्यांच्या मते महाराष्ट्र-कवींची परंपरा थोडी देखील खंडित झाली नाही. कारण महाराष्ट्रातील प्रत्येक कवी हा परंपराभंजक आहे, 'बंडवाला' आहे. बंडखोरी हेच थोर कवींचे आणि त्यांच्या थोरवीचे वैशिष्ट्य आहे. हे वैशिष्ट्य लक्षात घेऊन 'बीं' नी ज्ञानेश्वरांविषयी 'या वड्या बंडवाल्यांत ज्ञानेश्वर माने पहिला ! असे उद्गार काढले.

ज्ञानेश्वर आणि केशवसुत :

प्राचीन कवींत जसे ज्ञानेश्वर तसे अर्वाचीन कवींत 'केशवसुत' आहेत. केशवसुतांनी काव्याच्या क्षेत्रात केवळ बंडखोरी केली नाही तर एक प्रकारची क्रांती घडविली. पण ज्ञानेश्वर आणि केशवसुत यांच्यामध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. काही झाले तरी 'ज्ञानेश्वरी' हा भगवद्गीता आधाराला घेऊन रचलेला एक ग्रंथ आहे. त्यात ज्ञानेश्वराच्या कवित्वाचा आणि काव्य-विषयक विचारांचा आविष्कार प्रामुख्याने उपक्रमोपसंहारांत आणि प्रसंगोपात्त येणाऱ्या उद्गारांतूनच झाला.

केशवसुतांना भगवद्गीतेसारख्या एखाद्या ग्रंथाचे मिष करून रसाचा अविर्भाव करण्याची गरज वाटली नाही. ते ज्या काळात आणि ज्या समाजात वाढले आणि वागले व त्यांनी ज्या काव्यग्रंथांचे परिशीलन केले त्यांचा प्रभाव त्यांच्या काव्यावर प्रामुख्याने पडला. म्हणूनच त्यांच्या काव्यात अमुक एखादा रस 'मिरवला' असे कधीच झाले नाही.

केशवसुतांचे व्यक्तिमत्त्व एकंदरीने अन्तर्मुख स्वरूपाचे असल्यामुळे त्यांनी साध्या साध्या विषयांचे निमित्त करून त्यांतून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार केला. त्यांच्या मनःकोषात काव्य हाच विषय प्रामुख्याने घोळत असल्यामुळे, लाखेच्या तप्त रसात एखादी गोष्ट बुचकळून काढावी व तिने लाखेचा रंग घेऊनच बाहेर पडावे, त्याप्रमाणे केशवसुतांची जवळजवळ संपूर्ण कविता ही काव्यविषयातच रमली व रंगली.

केशवसुत आणि बी :

ज्ञानेश्वर आणि केशवसुत यांच्याच मालिकेतील 'बी' हेही एक श्रेष्ठ कवी आहेत. या दोहोंचा 'बी' कवींच्या कवितेवर सखोल ठसा उमटलेला दिसतो. या दोघा-प्रमाणेच बींनी देखील काव्यविषयक असा आपला वेगळा दृष्टिकोण मांडला आहे. केशवसुतांच्या कवितेच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रमाणात कदाचित् बींची कविता आत्मलक्षी नसेल, पण केशवसुतांप्रमाणे बी कवींची काव्यविषयक अनुभूती ही त्यांच्या अनेक महत्त्वाच्या काव्यांचे रूप घेऊन प्रकट झाली आहे, यात शंका नाही.

केशवसुत आणि बी हे वयोमानाच्या दृष्टीने एकाच काळातील असले तरी केशवसुत वयाच्या एकोणचाळिसाव्या वर्षी दिवंगत झाले आणि बी कवींनी आपली पहिली नाव घेण्यासारखी कविता केशवसुतांच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी प्रसिद्ध केली. अर्थात् उभयतांची काव्यवैशिष्ट्ये फार वेगळी नसल्यामुळे केशवसुतांच्या कवितेचा लक्षात येण्यासारखा प्रभाव, बी कवींच्या प्रतिमासृष्टीवर व शब्दसंपत्तीवर उमटून दिसला तर त्यात काही नवल नाही.

'बी' कवींचे काव्यविषयक चिंतन :

आजवर केशवसुतांच्या कवितेची निरनिराळ्या निमित्ताने फार विस्तृत आणि सखोल अशी छाननी झाली. त्या मानाने काही कवितांचा अपवाद सोडता बी कवींच्या बहुतेक कविता चिकित्सकांच्या दृष्टिक्षेपाच्या बाहेरच राहिल्या. 'बी' कवींच्या नानाविध कवितांमधून कवी या नात्याने अभिव्यक्त होणारे त्यांचे एकसंध व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवण्याचा पद्धतशीर प्रयत्न आजवर झालेला नाही. त्यांच्या काही महत्त्वाच्या कवितांचे अवलोकन केल्यास असे आढळून येते की त्यांनी काव्यनिर्मितीची, विशेषतः आधुनिक काव्यनिर्मितीची प्रक्रिया, पद्धती आणि परिणाम यांच्याविषयी फार सखोल चिंतन केले असून ते त्यांच्या काव्यातून समर्थपणे व्यक्त झाले आहे.

ज्ञानेश्वर आणि केशवसुत यांनी जे काही काव्यविषयक विचार मांडले ते त्यांच्या आत्मानुभूतीतून बहुधा अजाणता आणि बहुधा इतर विषयांच्या निमित्ताने प्रगट झाले आहेत. 'बी' कवींचे हे काव्यविषयक विचार बऱ्याच वेळा अजाणता व अप्रत्यक्षतः तर प्रकट झाले आहेतच; पण त्याशिवाय आपली काव्यविषयक पृथगात्म मते त्यांनी जाणीवपूर्वक व स्वतंत्रपणे मांडली आहेत व त्यांचे मोठ्या हिरिरीने समर्थन केले आहे.

बी कवींचा साहित्यशास्त्रविषयक दृष्टिकोण :

बी कवींच्या मताप्रमाणे आधुनिक मराठी कविता ही नवीन चालीरीती, नवीन भूषावेष व भावाविष्करणाच्या नवीन वाटा धारण करीत असल्यामुळे ती अद्याप प्रौढत्व पावली नाही. ती किंचित् उथळ व अल्लड वृत्तीची असून तिचे सौंदर्य अस्फुट आणि मुग्ध आहे. व्याकरणातील सूक्ष्मतर अशा कारकसंविरूपांच्या नियमांनी आणि साहित्यशास्त्रातील रसरीती इत्यादि प्रस्तावशेष झालेल्या नियमांनी तिच्या माधुर्याची, अगाध लावण्याची आणि निस्तुळ अशा रूपारीतींची बूझ होणार नाही. मराठी कवितेचे कुल नागर असून तिचा व्यवहार आणि संसार सतत नागर प्रदेशात आहे. तिने नाना प्रदेशातून शब्दरत्ने आणून आपले भाषाभांडार समृद्ध केले आहे. आधुनिक मराठी ही अयांग अशा अव्यक्तामधून निजलीलेने व्यक्त झालेली असल्यामुळे तिला लागू पडणारे साहित्यशास्त्राचे नियम तिचे तिनेच निर्माण केले आहेत.

> अयांग अव्यक्तातुनी होशी निजलीला व्यक्त
> तुझे तूच निर्मिशी प्रसाधन—शासन अभियुक्त !

'कविवंदन' ही तीन छोट्या खंडांनी विभागलेली बी कवींची कविता म्हणजे त्यांनी आपल्या काव्यविषयक विविध मतांवर लिहिलेला एक संक्षिप्त निबंधच आहे ! येथे गोविंदाग्रज आणि बालकवी या कवींच्या कृतींसंबंधी अभिप्राय जसा व्यक्त झाला आहे तसाच त्यांनी आपला आधुनिक मराठी कवितेविषयी आणि काव्य म्हणजे काय या प्रश्नासंबंधी एक स्पष्ट दृष्टिकोण व्यक्त केला आहे.

काव्य म्हणजे काय ?

> काव्य नव्हे शब्दांचा सुंदर नादमधुर मेळ,
> अर्थचमत्कृतिचाही नोहे डोंबारी खेळ,
> निसर्गसृष्टीची सादृश्ये, नीतिपाठ भव्य,
> घाटदार थाटाची रचना केवळ नच काव्य

अशा प्रकारे काव्याची व्यतिरेकात्मक व्याख्या करून 'बी' कवींनी पुढीलप्रमाणे अन्वय साधला आहे—

> ऐश्वर्यात्मक सामर्थ्याची निर्माणक्षमता
> अन्तरंग ओथंबुन ओसंडे ती 'सुंदरता'
> केवळ सौंदर्याची स्फुरणे प्रस्फुरणे दिव्य
> जिव्हार हेच स्वानंदाचे – 'सौंदर्यचि काव्य'

बी कवींनी आपल्या सुप्रसिद्ध 'पिंगा' या कवितेत प्रसन्न हृदयाच्या कोषामध्ये असलेल्या सौरभरसराशी लुटण्यासाठी कविमनाच्या वृत्ती याच भ्रमरी होतात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि चोरून रसपान करतात असे उद्गार काढले आहेत. कवींचे हृदय आणि त्याच्या वृत्ती यांचा पिंगा म्हणजेच काव्य होय.

काव्यनिर्मितीची प्रक्रिया :

कवीला प्रतिभेचे सामर्थ्य लाभले म्हणजे 'स्वान्तः सुखाय' अशी कविता निर्माण होते. ही काव्यनिर्मितीची प्रक्रिया अत्यंत सूक्ष्म असून कवीच्या अंतःकरणात उत्पन्न होणारे सर्व भाव हे केवळ संज्ञेनेच व्यक्त करता येतात. 'निवेदन' या कवितेत कवी बी म्हणतात——

अपार्थिव जे संगूढ भाव चित्ती
व्यक्त संज्ञेने मात्र करू येती !
स्पष्ट करिता ते वळे सर्व जाते
कांति मार्दव, सौरस्य त्यांतले ते !

'विचारतरंग' या कवितेत हाच आशय ते अशा रीतीने प्रकटवितात—

अन्तःकरण पटावरती, आत्यंतिक वेगे उठती
दिव्य लेख उन्मेषाचे, धरावया ते स्मृति काचे
बुद्धीच्या भिंगावरती, बिंबित ज्या प्रतिमा होती
शब्दचित्र त्यांचे कसले, न कळे काढिल मन दुबळे ?

काव्यनिर्मितीची प्रक्रिया बींनी आपल्या या कवितेत अत्यंत सूचक आणि मार्मिक शब्दांनी उकलून दाखविली आहे.

कवी बी आणि प्रतिभा :

कवी बी यांनी मराठी कवितेच्या प्रांतात पहिले पाऊल टाकले ते प्रतिभाविषयक विचार मांडण्यासाठीच. 'वेडगाणे' ही ती प्रसिद्ध कविता. प्रतिभेच्या अलौकिक सामर्थ्याचे वर्णन करावे बी कवींनीच. सर्वसामान्य लोक जिला काव्य करणारी असे म्हणतात ती वस्तुतः स्वर्गीय आणि अलौकिक अशी दावती असून तिच्या ठिकाणी स्वयंप्रकाशित्व, सर्वगामित्व आणि अतींद्रीयत्व हे गुण असतात. सृष्टीमधले सारे सौंदर्य तिच्या सामर्थ्यात एकवटले असून तीच सगळ्या ब्रम्हांडाच्या घडामोडी करीत असते. परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चार वाणींपैकी केवळ मध्यमा ही मनोमय वाणीच तिचे सामर्थ्य वर्णन करू शकेल. अत्यंत जड असलेल्या 'वैखरी'-ला तिचे वर्णन करता येणार नाही.

'कविवंदन' या कवितेत सौंदर्य हेच काव्य होय, असे सांगितल्यानंतर बी म्हणतात—

या सौंदर्यस्फुरण्या म्हणती 'चैतन्य-स्फूर्ती
प्रसाद-भगवंताचे देणे-नैसर्गिक शक्ती'
देवी शारदा हीच, नव्हे स्थल अभ्यासा साध्य
लोकोत्तर काव्याचे हेचि प्रसवस्थल आद्य.

अशा रीतीने प्रतिभेचे लक्षण वर्णन करून इतर काही ठिकाणी प्रतिभेचे वैशिष्टच सूचित केले आहे. उदाहरणार्थ——

राहे सत्कविकल्पनेत, सवितातेजात जी दिव्यता
—प्रमीला

चित्ताची बनवून मूस, तुमच्या सत्कल्पनेच्या करे
ओता मूर्ति तुम्हीच, कारण गिरा लाजोनि येथे सरे
—आशादेवी

थांबा थांबा रसिकवरा ! गदारोळ हा पुरे करा !
प्राण कल्पना काव्याला, नकळे हे मतिमंदाला
भौतिक शास्त्री वा काव्यी, कल्पनाच वैभव मिरवी
अभेद मज दोहोंत दिसे, कोण शहाणे, कोण पिसे ?

जे जे विश्वी ज्ञेय असे त्यात कल्पना मात्र वसे
करा कल्पना वजा बरे, म्हणजे बाकी शून्य उरे
—विचारतरंग

वोसंडे दुथडी भरूनि सरिता-सत्कल्पना पावन
वृत्तींची रसलीन चंचळ खगश्रेणी करी क्रीडन
—काव्यानंद

प्रतिभेलाच 'कल्पना' असे दुसरे नाव असून या निर्माण-शक्तीचा अंश असल्याशिवाय कवीच्या काव्यकौमुदीला बहर येत नाही असे बींनी आपल्या 'पिकले पान' या कवितेत म्हटले आहे.

पद्य मजला येईल करू जाता—
त्यात ओतू मी काव्य कसे आता ?

या 'पिकले पान' मधील पंक्तीत पद्य आणि काव्य. यामधील भेद प्रतिभाशक्तीमुळे पडतो असे दाखविले आहे 'स्वैर गीत' या कवितेत—

प्रतिभेच्या आरशात पडते निसर्गछाया मनोहर
वाङ्मय तप कर; प्रसन्न होईल प्रतिमादेवी निरंतर

या शब्दांत प्रतिभा आणि निसर्ग यांचा संबंध व्यक्त केला आहे. बी कवींच्या मते प्रतिभा ही काव्यविषयांची निर्माती असून तिने केवळ प्रणयपंकजाबरोवर खेळणे बंद केले पाहिजे. ' नियमाचे परिपालन सरले, जाय कराया मुलुखगिरी ' असा प्रतिभेचा एक विशेष येथे वर्णन केला आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'फुलांची ओंजळ' या कवितेत आकाशाचे आंगण झाडून सृष्टीसुंदरी आपल्या कलाचातुर्याने ज्या चित्र-विचित्र रेखा काढते तेच काव्य होय, असे म्हटले आहे. आकाशातील एक अणू घेऊन त्यात कवी विश्वाचे रूप दाखवितो असेही बी कवींचे मत आहे.

नावात काय आहे ?

काव्यविषयाचे क्षेत्र विश्वव्यापक असले तरी काव्य-निर्मितीच्या वेळी कवी हा आपल्या काव्यविषयाशी तादात्म्य पावलेला असतो. काव्याच्या 'प्रमदवना' मध्ये शिरल्यानंतर कवी स्वतः तेथील 'तरुलता' बनतात आणि आपले नामरूपात्मक अस्तित्व विसरून जातात. काव्यनिर्मितीच्या आनंदाने कवी डोलू लागला म्हणजे आपोआप काव्याची निर्मिती होते. काव्याचा विषय आणि कवी यांच्यामध्ये असे 'अद्वैत' असल्यामुळे कवीला एक प्रकारची आत्मविस्मृती येते. अर्थात अशा कवीच्या वैयक्तिक जीवनात डोकावणे किंवा त्याच्या नावाची चौकशी करणे हे खऱ्या रसिकाला न शोभणारे आहे असे 'बी' कवींनी 'नावात काय आहे ?' या कवितेत स्पष्टपणे सांगितले आहे. 'आम्ही' या कवितेत कवीच्या सामर्थ्याचे 'शून्ये वसू लागती' असे केशवसुतांच्या 'शून्यामाजि वसाहती वसविल्या' या चालीवर वर्णन केले आहे. रामकृष्ण, रुद्र, बुद्ध, महंमद आणि ख्रिस्त यांच्यातील अलौकिक गुणांचा आविष्कार कवींनीच केला आहे असे बी 'आम्ही' या कवितेत म्हणतात.

कवी आणि निसर्ग :

'स्वैरगीत' या कवितेत प्रतिभा आणि निसर्ग यांचा जसा संबंध वर्णन केला आहे त्याचप्रमाणे 'फुलांची ओंजळ' या कवितेतही कवी हा सृष्टीशी समरस होतो, तो तिचा अन्तश्चर प्राणच आहे, किंबहुना सृष्टीच्या हृद्कमळाची ती एक 'फुलती मिटती कळा' आहे, असे वर्णन केले आहे. सृष्टी आणि कवी यांच्यातील हे अद्वैत बी यांच्या शब्दांत असे आहे—

> **कवीच झाला सृष्टी, सारी सृष्टी झाली कवी**
> **दिसण्याचे–लपण्याचे गारुड अपूर्व हा भासवी**
> **हा हसता हसते ती, अथवा हा रडता ती रडे**
> **पहाट फुटते हा उठता, हा निजता झापड पडे**

कवी हे सृष्टीचे लाडके असून त्यांच्याशी सृष्टी सुखसंवाद करीत असते. पूर्णापासून ढळलेले जग पूर्णाकडे जात असतांना आक्रमण करण्याची वाट मोठी बिकट आणि वाकडी आहे. या खडतर मार्गावरून हे सृष्टिचक्र चालत असताना त्याचा तोल जाऊन ते भलतीकडे वळू नये म्हणून त्याला योग्य मार्ग दाखविणे, त्याचे तेजोबल वाढविणे आणि हे सृष्टिचक्र सरळ मार्गाने चालविणे हे कवींचे प्रमुख कार्य आहे. इतकेच काय पण बींच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे—

> **काव्य अगोदर झाले, नंतर झाले जग सुंदर**
> **रामायण आधी, मग झाला राम जानकीवर !**

चाफा फुली आला फुलून !

'फुलांची ओंजळ' या कवितेत सृष्टी आणि कवी यांची जी एकरूपता वर्णिली आहे तिचाच एक आगळा अविष्कार 'चाफा' या कवितेतही दिसून येतो. 'अफाट जग हाटात पाहिला, हिरमुसला एकटा' असा लडिवाळ आणि वेल्हाळ कवी आपले काव्य फुलत नाही असे पाहून निरनिराळ्या रीतीने त्याला फुलविण्याचा जो प्रयत्न करितो, त्याचे मनोज्ञ वर्णन 'चाफा' या कवितेत केले आहे. काव्याची चाफेकळी फुलावी म्हणून कवी-हृदयाने त्याला आंब्याच्या वनात नेले. तेथील मैनांबरोबर त्यांनी गळ्यांत गळे गिळवून गाणी म्हटली. कविहृदय काव्यरूपी चाफ्याला घेऊन केतकीच्या वनात गेले. तेथे दरवळलेल्या गंधाने नागांबरोबर त्यांचेही देहभान नाहीसे झाले. पुढे ते सारा माळरान हिंडून आले. तेथील पशूंच्या बरोबर हुंदर घालत असताना त्या कोलाहलाने सारे रान भरून गेले. हाच कोलाहल नदीच्या गर्जनेत, विजेच्या गडगडाटात आणि वायूच्या धांगडधिंग्यातही दिसून आला. वस्तुतः काव्य म्हणजे निसर्गाला घडवडता प्राण आणि कवीची प्रतिभा तर सृष्टिसुरांत सूर भरणारी. मग त्या सृष्टीला हा अबोल राणा कसा बरे आवडणार ? कविहृदयाने काव्याची चाफेकळी उमलावी, चाफा फुलावा म्हणून नाना प्रकारे त्याला आळविले. वास्तविक कवी आणि त्याचे काव्य यांच्या क्रीडेसाठीच तर हे विश्वाचे आंगण त्यांना आंदण मिळाले आहे. सर्वसामान्य लोक बाह्य विषयांत रममाण होतात. पण खरा कवी आणि त्याचे काव्य हे चित्य वस्तूच्या अन्तरंगाशी तन्मय होतात. 'एक दृश्य' या कवितेत म्हटल्याप्रमाणे—

> **तन्मयता ती चिन्त्य वस्तुच्या खोल अन्तरी शिरते**
> **बहिरंगाच्या वरते नुसते फेरे घालित नसते !**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवी आणि त्याचे काव्य यांची एकमेकांच्या दृष्टीला दृष्टी मिळाल्याबरोबर कवीच्या ठिकाणी सात्त्विक भाव जागृत झाले. आणि त्या बरोबरच—

चाफा फुली आला फुलून—
तेजी दिशा गेल्या आटुन
कोण मी — चाफा ? कोठे दोघे जण ?

अशा रीतीने चाफा या कवितेत कविहृदय आणि काव्यविषय यांचे मनोहारी मिलन कसे झाले याचे वर्णन आहे. बींच्या मते——

रसास्वादनोचित विषयांचे केवळ करिता येते स्वसंवेद्य आस्वादन; तेथे वाचा स्तंभित होते !
—रूपमुग्धा

हेच शुद्ध रसपान 'चाफा' या कवितेत वर्णन केले आहे.

बीं ची कविता गोफण नव्हे, गोफ !

बी कवींच्या 'नावात काय आहे ?' 'वेडगाणे', 'पिंगा', 'चाफा' आणि 'फुलांची ओंजळ' या प्रमुख कवितांमधून त्यांच्या काव्यविषयक विचारांचा धागा अनुस्यूत झाला आहे. पण अशा कवितांबरोबर बींनी 'दीपज्योतीस', 'माझी कन्या' व 'कमळा' अशा इतरही बहारदार कविता लिहिल्या.

केसवसुताप्रमाणे 'बी' कवींची प्रत्येक कविता ही कमी-अधिक प्रमाणात कवी आणि काव्य या विषया-भोवतीच गुंफलेली आहे असे म्हणता येत नाही. केशव-सुतांनी आपल्या कवितेची वीण गुंफताना जमविलेले सर्व पदर त्यांना काव्यविषयाचाच पीळ देऊन त्यांतून एक घट्ट आणि भरदार पण मुलायम आणि सुंदर गोफण तयार केली. त्या गोफणीतून त्यांनी जी शब्द-रूपी दृषदांची हाणाहाण केली, तीमुळे रसिकवरांच्या मस्तकामधून विचारांच्या झिणझिण्या निर्माण झाल्या. 'कि कवेस्तेन काव्येन ..न घूर्णयति यच्छिरः' हे वचन केशवसुतांनी आपल्या दमदार कवितेने अक्षरशः सार्थ केले.

'बी' कवींच्या कवितेत काव्यविषयक विचाराचा पीळ तेवढा दमदार नाही. पण केशवसुतांची कविता शब्ददृषदांची हाणाहाण करणारी गोफण असेल तर बी कवींची कविता विविध विषयांच्या पदरांनी गुंफलेला एक बहुरंगी गोफ आहे. काव्यविषयक विचारांच्या रंगाने शोभिवंत दिसणारा त्यातील एक पदर आपल्या आगळेपणाने बी कवींच्या कवितेच्या बहुरंगी गोफाल वेगळाच तजेला आणतो यात शंका नाही.

कै. बाळाजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
36332-अ.
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 24.2.98
28.
विदर्भ साहित्य संघ, नागपूर
R.Z.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(आक्टोबर १९६८)

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

चित्रकार श्री भाऊ समर्थ यांचा सत्कार

दि. २६-९-६८ ला चित्रकार श्री भाऊ समर्थ यांना शाल व श्रीफळ देऊन वि. सा. संघाच्या स्वरमंडळाने सत्कार केला. त्यांनी स्वरमंडळाच्या स्मरणिकेला आपले अत्याधुनिक चित्र देऊन तिला चिरंतन काळ टिकणारे महत्व प्राप्त करून दिले. या समारंभासोबत त्यांच्या २८ चित्रकृतींचे एक प्रदर्शन कला केन्द्राने आयोजित केले होते. टाईम्स ऑफ इंडियाचे नागपूरचे प्रमुख प्रतिनिधी श्री. बी. के. वैद्य हे उद्घाटक म्हणून होते. हे प्रदर्शन एक आठवडाभर उघडे होते.

श्री. वैद्य म्हणाले की भाऊ समर्थ हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलाकार आहेत पण त्यांच्या जीवनांत दारिद्र्याचा कहर आहे. साधारण माणूस जिथे जगू शकत नाही तिथे श्री. भाऊ समर्थांनी पाठीवर सात कुटुंबाचे ओझे घेऊन कलेची चरम सीमा गाठली हे नवल आहे. श्री. भाऊ समर्थांना चांगले दिवस यावेत आणि ते विदर्भातले आहेत म्हणून त्यांच्या कलेची हेळसांड होऊ नये. त्यांच्या चित्रांची प्रदर्शने मुंबई व दिल्लीला आयोजित व्हायला हवीत ही जबाबदारी वि. सा. संघासारख्या संस्थांनी उचलावी असेही श्री. वैद्य म्हणाले.

कै. जगन्नाथबुवा पुरोहित यांना श्रद्धांजलि

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समिती अंतर्गत असलेल्या संगीत केंद्रातर्फे रविवार दि. २७ ऑक्टोबर १९६८ रोजी सुप्रसिद्ध गायक आणि अनेक श्रेष्ठ गायक-गायिकांचे गुरू कै. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्या दुःखद निधनानिमित्त नागपूरातील प्रसिद्ध गायक व संगीत शिक्षक श्री. शंकरराव सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी श्री. प्रभाकर चाफेकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर बुवांचे एक शिष्य श्री. मधुसूदन भावे, तरुण गायक श्री. राजेश्वर बोबडे व नागपूरच्या गायिका सौ. उषा पारखी व नभोवाणीवरील एक कलावंत श्री. मधुकरराव गुळवणी आणि व्हायोलिन वादक श्री. माधवराव डोंगरे व श्री. जयंतराव वाटवे यांनी आपापली श्रद्धांजली अर्पण केली.

नाट्यसमिती

नाट्यवाचन

विदर्भ साहित्य संघाच्या नाट्यसमितीतर्फे रविवार दि. २७ ऑक्टोबर ६८ रोजी दुपारी ३-३० वा. श्री. द. ग. गोडसे यांच्या " राजियाचा पुत्र अपराधी देखा " ह्या नाटकाचे वाचन झाले. सायंकाळी ६-३० वाजता मुंबईचे श्री. माधव वाटवे यांनी लिहिलेल्या " नाटककाराच्या शोधात सहा पात्रे " ह्या नाटकाचे वाचन झाले.

वि. सा संघास भेट

भारतीय कीर्तीचे शिल्पकार श्री. बी. विठ्ठल आणि चित्रकर्ती सौ. बी. प्रभा ह्यांनी गुरुवार दि. ३१-१०-६८ रोजी वि. सा. संघाच्या कला केन्द्रास भेट दिली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी रंगभूमिचा १२५ वर्धापन दिन

विदर्भ साहित्य संघाने मराठी रंगभूमीचा १२५ वा वर्धापन दिन मंगळवार दिनांक ५ नोव्हेंबर १९६८ रोजी मोठ्या उत्साहाने व कल्पकतेने साजरा केला.

सकाळी ११ वाजता मराठी रंगभूमीचे उपासक श्री. के. टी. देशमुख यांनी धनवटे रंगमंदिराच्या रंगमंचाची पूजा केली. रंगमंचावर रंगभूमीच्या नाटचपंचायतनांच्या छायाचित्राची मांडणी केली होती. त्याचबरोबर त्यांच्या संग्रही असणाऱ्या कै. विष्णुदास भावे यांनी स्वतः हाताने तयार केलेल्या कळसूत्री बाहुल्या व इतर कांही पुरातन वस्तूसुद्धा पूजेसाठी रंगमंचावर मांडण्यात आल्या होत्या. त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने पूजा झाली. या पूजेचे पौरोहित्य नागपूरातील वयोवृद्ध नट वे. शा. सं श्री. दाते गुरुजी यांनी केले.

सायंकाळी ६–३० वाजता मराठी रंगभूमि दिन धनवटे रंगमंदिरात संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

याप्रसंगी गुजराथी रंगभूमिचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक व नट श्री. कांती माडिया व मराठी रंगभूमीच्या सुप्रसिद्ध दिग्दर्शिका व नटी सौ. सुधा करमरकर यांची भाषणे झाली.

श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाने मराठी रंगभूमी प्रदर्शनहि आयोजित केले होते. गेल्या १२५ वर्षांत मराठी रंगभूमीवर आलेल्या असंख्य नाटकांपैकी रंगभूमीवर गाजलेल्या १२५ निवडक नाटकांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती.

तसेच मराठी रंगभूमीवर लिहिलेली समीक्षणात्मक व चरित्रात्मक पुस्तकें मांडण्यात आली होती.

"शास्त्रीय मराठी व्याकरणकार" कै. मोरो केशव दामले यांची जन्मशताब्दी

विदर्भ साहित्य संघातर्फे गुरुवार दिनांक ७ नोव्हेंबर १९६८ रोजी सायंकाळी ६ वाजता "शास्त्रीय मराठी व्याकरण" या ग्रंथाचे लेखक सुप्रसिद्ध व्याकरणकार श्री. मोरो केशव दामले यांची जन्मशताब्दी संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी समागृहात साजरी करण्यात आली.

संस्थेचे सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांचे प्रास्ताविक भाषणानंतर प्रमुख वक्ते प्रा. ग. वा. करंदीकर यांनी कै. मोरो केशव दामले यांनी केलेल्या कार्यांबद्दल व्यासंगपूर्ण भाषण करून कै. दामले यांना आदरांजली अर्पण केली.

या प्रसंगी सर्वश्री प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख, कविवर्य अनिल आणि भाऊसाहेब माडखोलकर ह्यांची व्याकरणकारांच्या गौरवपर भाषणे झाली.

संगीत सभा

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समिती अंतर्गत असलेल्या संगीत केन्द्रातर्फे गुरुवार दि. ७ नोव्हेंबर १९६८ रोजी सायंकाळी ७ वाजता ख्यातनाम संगीतज्ञ व लेखक श्री. वा. ह. देशपांडे (मुंबई) यांनी भेट दिली व मार्गदर्शनपर भाषण दिले.

या प्रसंगी आयोजित केलेल्या संगीत सभेत सौ. मीरा परांजपे (मीरा साठे) सौ. लता दुरुगकर (लता साठे) सौ. उषा पारखी आणि श्री. बाळ फडणीस यांचे गायन झाले.

यावेळी तबल्याची साथ श्री. भजनी व पेटीची साथ श्री. पातुरकर यांनी आणि व्हायोलिनची साथ श्री. पारखी यांनी करून मैफलीत रंग आणला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालय

नेहरू–वाङ्मय दर्शन

भारताचे माजी पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार दि. १४ नोव्हेंबर १९६८ रोजीं " नेहरू वाङमय दर्शन " म्हणून ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले होते.

या प्रदर्शनात पं. नेहरूंच्या साहित्याची आकर्षक मांडणी करण्यात आली होती.

ज्ञानेश्वर पुण्यतिथीचा सोहळा

विदर्भ साहित्य संघांतर्गत असलेल्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यास मंडळातर्फे सोमवार दि. १८–११–६८ रोजी श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यतिथी थाटात साजरी करण्यात आली. संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयात ज्ञानेश्वर वाङ्मय दर्शन नावाचे छोटेसे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ज्ञानेश्वरांच्या संबंधी लिहिलेली अनेक मौलिक पुस्तकें या छोटयाशा ग्रंथप्रदर्शनास कलात्मकरीत्या ठेवण्यात आलेली होती. महाराष्ट्राचे संपादक श्री. भाऊसाहेब पंडित हे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी ज्ञानेश्वराच्या प्रतिमेला हार अर्पण केला. डॉ. द. भि. कुळकर्णी, चरित्रकार ज. रा. जोशी, श्री. ग. स. देशपांडे, श्री. प्रियदर्शन पंडित, अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी व अनेक अभ्यासकांनी प्रदर्शनास भेट दिली. या कार्यक्रमाचे संयोजन अभ्यासमंडळाचे आमंत्रक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले.

आजीव सभासद

राजकुमार श्रीमंत माधवराव चिंतामणराव पटवर्धन, सांगली, रु. १०१–०० व
श्री. हणमंतराव रघुनाथराव कोटणीस, सांगली, रु. १०१–००
हे संस्थेचे आजीव सभासद झाल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

शाखा वृत्त

वर्धा–शाखा

वर्धा शाखेच्या सभासदांची सभा दि. १८–१०–६८ रोजी झाली.

या सभेत श्री. मंगरुळकर, कार्यवाह यांनी श्री. ब्रिजलाल बियाणी, श्री. बाळासाहेब खापर्डे व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली.

यावेळी प्रा. दे. गं. सोटे व श्री. देशमुख यांची भाषणे झाली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समिती : वि. सा. संघ

केंद्राधिकाऱ्यांना सूचना व विनंती

१) विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङ्‌मयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देश :—मराठी भाषा आणि वाङ्‌मय या विषयाची गोडी वाढविण्यासाठी तसेच महाराष्ट्रा-तील अ-मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

फेब्रुवारी १९६९ पासून परीक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परीक्षांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

२) आपण केन्द्र उघडण्याची इच्छा दर्शविल्यास आपणाकडे अभ्यासक्रम पाठविण्यात येईल अ-मराठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी आपण आपल्या दृष्टीने करावी, अशी अपेक्षा आहे.

३) आगामी फेब्रुवारी १९६९ सत्राची परीक्षा शनिवार दि. १-२-६९ आणि रविवार दिनांक २-२-६९ ला घेण्यात येईल.

४) नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परीक्षेत बसविले तर केंद्राला मान्यता देण्यात येते असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी आवेदनपत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केन्द्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. केवळ परिक्षार्थ्यांचेच निर्धारित शुल्क केन्द्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपण आपल्या केन्द्रातून दिनांक ५ जानेवारी १९६९ पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केन्द्रीय कार्यालयाकडे दिनांक १० जानेवारी १९६९ चे आंत पाठविण्याची दखल घ्यावी, तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे.

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ